# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
# नाशिक – ४२२२२२

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा
## बी. एड. शिक्षणक्रम माहितीपुस्तिका (P80)

**शैक्षणिक वर्ष : २०२५ – २०२७**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | बी. एड. शिक्षणक्रमाच्या माहितीचा तपशील | पान.क्र. |
|---|---|---|
| | **बी. एड. शिक्षणक्रमासंबंधी माहिती** | ०३ |
| **भाग I** | **बी. एड. प्रवेशासंदर्भात महत्वपूर्ण सूचना-** | ०३ ते ०४ |
| **भाग II** | **बी. एड. प्रवेशासंदर्भात माहिती** | |
| १ | **मुक्त विद्यापीठाविषयी थोडेसे** | ०५ |
| २ | विद्याशाखा परिचय | ०५ |
| ३ | हा शिक्षणक्रम कोणासाठी ? | ०५ |
| ४ | एन. सी. टी. ई. प्रवेश नियम | ०५ ते ०६ |
| ५ | जिल्हानिहाय जागा | ०६ |
| ६ | अतिरिक्त जागा | ०६ |
| ७ | आरक्षण | ०६ ते १० |
| ८ | शिक्षणक्रम प्रवेश पात्रता | १० |
| ९ | प्रवेश अपात्रता | १० ते ११ |
| १० | प्रवेश अर्ज कसा भरावा ? | ११ ते १५ |
| ११ | निवड प्रक्रिया | १५ ते १८ |
| १२ | शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रम | १८ ते २० |
| १३ | संपर्कसत्रे | २० ते २१ |
| १४ | अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी | २१ |
| १५ | अध्ययनार्थी मूल्यमापन | २१ ते २३ |
| १६ | शिक्षणक्रम शुल्क | २३ ते २४ |
| १७ | Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना | २४ |
| १८ | विभागनिहाय व जिल्हानिहाय अभ्यासकेंद्रे | २४ ते २८ |
| १९ | विशेष नोंदी | २८ ते २९ |
| २० | संपर्कासाठी पत्ते | ३० |
| | **परिशिष्टे** | |
| १ | जातीनिहाय आरक्षण | ३१ |
| २ | सेवा नोंद तक्ता | ३२ ते ३३ |
| ३ | अध्ययनार्थ्याने भरावयाचे हमीपत्र | ३४ |
| ४ | प्राथमिक शिक्षकांसाठी शिफारस प्रमाणपत्र | ३५ |

## १. शिक्षणक्रमासंबंधी माहिती

देशभरातील पारंपरिक विद्यापीठांमधून दोन वर्षे कालावधीचा नियमित 'बी. एड. शिक्षणक्रम' (P-80) सुरू आहे. नियमित बी. एड. शिक्षणक्रम सेवांतर्गत शिक्षकांना करणे शक्य नाही. त्यामुळे मुक्त विद्यापीठाने सेवांतर्गत शिक्षकांसाठी नोकरी करताना पूर्ण करता येईल असा दोन वर्षे कालावधीचा 'सेवांतर्गत शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम' (बी. एड.) १९९१ पासून सुरू केला.

**(२.१) कालावधी** - या शिक्षणक्रमाचा **किमान कालावधी दोन वर्षांचा** व **कमाल कालावधी चार वर्षांचा** आहे.

**(२.२) एकूण श्रेयांक** - हा शिक्षणक्रम **८०** श्रेयांकांचा म्हणजे सुमारे **२४००** अध्ययन तासांचा आहे. (एक श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ तासांचा अभ्यास होय.)

**(२.३) शिक्षणक्रम माध्यम** - बी. एड. शिक्षणक्रमाचे माध्यम **मराठी** आहे. या शिक्षणक्रमाचे स्वयं-अध्ययन साहित्य मराठीत आहे .

## भाग- I - सेवांतर्गत बी. एड. प्रवेशासंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना

★ **महत्त्वपूर्ण सूचना**

१) अर्जदाराने या शिक्षणक्रमाची प्रवेश माहितीपुस्तिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून घ्यावी. माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे या शिक्षणक्रमासाठी असलेल्या प्रवेश लिंक वरून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरता येईल. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना आपण भरलेली माहिती बरोबर आहे का? याची खात्री अर्जदाराने करणे बंधनकारक आहे. त्यासंदर्भात नंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. प्रवेश अर्जात भरलेली माहिती बरोबर आहे का? याची खात्री करूनच 'Submit' बटन दाबावे.

२) प्रवेश अर्ज भरण्याची शेवटची मुदत संपल्यानंतर, दिलेल्या मुदतीत स्वतःच्या प्रवेश अर्जात दुरुस्ती करण्याची संधी (स्वयं-संपादन) अर्जदाराला देण्यात येईल. या मुदतीतच अर्जदाराने प्रवेश अर्जात आवश्यक ती दुरुस्ती करावी.

३) २०२५-२७ सेवांतर्गत बी. एड. तुकडीचा प्रवेश अर्ज भरण्यासाठी सेवा अनुभव **दि.३० एप्रिल २०२५** पर्यंत नोंदविता येईल. या तारखेनंतरचा सेवा अनुभव यावर्षीच्या प्रवेशासाठी विचारात घेतला जाणार नाही.

४) ऑनलाईन प्रवेश अर्जात भरलेल्या संपूर्ण माहितीचे मूळ पुरावे पडताळणीवेळी अर्जदाराकडे असणे अनिवार्य असेल. मूळ कागदपत्र सादर न केल्यास संबंधित माहिती ग्राह्य धरली जाणार नाही.

५) सेवांतर्गत बी. एड. प्रवेश अर्ज शुल्क **खुल्या प्रवर्गासाठी रु. १०००/-** आणि **राखीव प्रवर्गासाठी रु. ५००/-** आहे. प्रवेश अर्ज भरतेवेळी सदर **शुल्क ऑनलाईन पद्धतीनेच** भरावे.

६) ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जातील माहितीच्या आधारे खुला व आरक्षित प्रवर्गाची केंद्रनिहाय कागदपत्र पडताळणी यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर विद्यापीठाने दिलेल्या सूचनेनुसार गुणवत्ता यादीतील केंद्रनिहाय प्रवेश संख्येनुसार संबंधित अर्जदाराने विभागीय केंद्रावर आपल्या प्रवेश अर्जाची पडताळणी करून घ्यावी. विभागीय केंद्राने अर्जदाराच्या प्रवेश अर्जातील भरलेल्या माहितीची खात्री केल्यानंतर केंद्रनिहाय प्रवेश गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल, त्यानंतर विद्यापीठ व अभ्यासकेंद्र शुल्क भरून अर्जदाराने आपला प्रवेश नियोजित कालावधीत निश्चित करावा. आपल्या प्रवेशासंदर्भातील माहिती / कागदपत्रे चुकीची असल्याची तक्रार विद्यापीठाला प्राप्त झाल्यास विद्यापीठ समितीमार्फत आपल्या प्रवेशाची चौकशी करण्यात येईल. तक्रारीत तथ्य आढळल्यास आपला प्रवेश रद्द करण्यात येईल. प्रवेश

रद्द करताना आपण भरलेले प्रवेश शुल्क परत केले जाणार नाही. तसेच आपल्यावर खोटी माहिती पुरविल्याबद्दल पोलिस स्टेशन / पोलिसांत (FIR) तक्रार करण्यात येईल, याची अर्जदारांनी नोंद घ्यावी. ज्या अर्जदारांना आरक्षणांतर्गत प्रवेश घ्यायचा आहे. अशा अर्जदारांनी शासन निर्णयानुसार आवश्यक ती सर्व वैध कागदपत्रे तसेच नॉन–क्रिमीलिअर प्रमाणपत्र विभागीय केंद्र प्रवेश अर्ज पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

७) विभागीय केंद्रावर कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर प्रवेश अर्ज आपोआप लॉक होईल. त्यामुळे पडताळणी नंतर कोणत्याही बदलासंदर्भातील पत्रव्यवहार विद्यापीठाला करू नये.

८) अर्जदारांनी आपल्या शाळेच्या जिल्ह्यातूनच प्रवेश अर्ज भरावा; अन्यथा प्रवेश प्रक्रियेतून तो बाद होईल. जिल्हानिहाय अभ्यासकेंद्राची यादी असणारा तक्ता या माहितीपुस्तिकेत बी. एड. शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र या मुद्यांतर्गत देण्यात आलेली आहे. **उदा :**

- मुंबई उपनगर (सबअर्बन) साठी - **चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर** हे केंद्र असेल. यात बोरिवली (URC-1), कांदिवली (URC-2), गोरेगाव (URC-3), अंधेरी (URC-4), सांताक्रूझ (URC-5), भांडूप (URC-6), घाटकोपर (URC-7), चेंबूर (URC-8), कुर्ला (URC-9), घाटकोपर (DYD_URC3), अंधेरी (DYD_URC5), मालाड W (DYD_URC6), कांदिवली E (DYD_URC7), हे भाग असतील.
- मुंबई शहरासाठी - **एस. टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धोबीतलाव** हे अभ्यासकेंद्र असेल. यात परेल (URC-10), दादर (URC-11), भायखळा (URC-12), ग्रँटरोड (DYD_URC1), सायन (DYD_URC2), मुलूड (DYD_URC4) हे भाग असतील.
- ठाणे जिल्ह्यासाठी – सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर असेल.
- पालघर जिल्ह्यासाठी – दीप शैक्षणिक सोसायटीचे, ए.जी. एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन बोईसर, जि. पालघर असेल.
- रायगड जिल्ह्यासाठी - शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रायगड असेल.

९) प्रत्येक जिल्ह्याला स्वतंत्र अभ्यासकेंद्र आहे. अर्जदाराने आपल्या शाळेच्या जिल्ह्याचाच अभ्यासकेंद्र म्हणून विचार करणे अनिवार्य आहे.

१०) एखाद्या जिल्ह्याच्या जागा प्रवेश अर्जांअभावी रिक्त राहिल्यास विद्यापीठाच्या त्या विभागातील उर्वरित जिल्ह्यांच्या संबंधित प्रवर्गातील सर्व अर्जदारांचा एकत्रित गुणवत्ता यादी तयार करून गुणवत्तेनुसार संबंधित प्रवर्गातील उर्वरित जागा नव्याने तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील अर्जदारांच्या जिल्ह्यातच अतिरिक्त जागा म्हणून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील, हे करताना त्या जिल्ह्यातील जागा ५० पेक्षा जास्त होणार नाही याची खबरदारी करण्यात येईल.

११) दिव्यांगांसाठी ५% म्हणजे एकूण ७५ जागा भरण्यात येतील. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याला २/३ जागा दिव्यांग अध्ययनार्थी प्रवेश कार्यपद्धतीनुसार गुणवत्ता यादीचा विचार करून भरण्यात येतील. ज्या जिल्ह्यात दिव्यांगांचे अर्ज जास्त असतील, त्यातील पाच जिल्ह्यांना दिव्यांगांच्या तीन जागा देण्यात येतील.

१२) प्रवेशासंदर्भातील सर्व सूचना 'http://ycmou.digitaluniversity.ac' या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील. अर्जदाराने त्या पाहून त्यानुसार कृती करण्याची जबाबदारी अर्जदाराची असेल.

१३) प्रवेशानंतर विद्यापीठाकडून सेवांतर्गत बी. एड. शिक्षणक्रम संरचना, अभ्यासविषयक साहित्य किंवा अभ्यासकेंद्रात कोणत्याही कारणास्तव बदल करण्यात आला तर तो अर्जदाराला बंधनकारक असेल.

**महत्त्वाचे - या शिक्षणक्रमाला दिला जाणारा प्रवेश केवळ गुणवत्तेनुसार व नियमानुसार दिला जातो. अन्य कोणताही मार्ग कोणी सूचित केल्यास मा. कुलसचिव यांच्याकडे लेखी तक्रार करावी.**

# भाग –II सेवांतर्गत बी. एड. प्रवेशासंदर्भात माहिती

## १. मुक्त विद्यापीठाविषयी थोडेसे –

महाराष्ट्र शासनाने मुक्त विद्यापीठाची स्थापना ‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा १९८९’ अन्वये १ जुलै १९८९ रोजी केली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून, विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे आहे. शिक्षणाची आवड असलेल्या अनेक व्यक्तींना स्वतःची नोकरी, व्यवसाय वा उद्योग सांभाळून स्वयं-अध्ययनाद्वारे पुढे शिक्षण घेता यावे, या हेतूने मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. मुक्त विद्यापीठाचे ध्येय लोक विद्यापीठ बनणे हे आहे. मुक्त विद्यापीठाच्या कार्याची दखल घेऊन २००२ व २०१९ या वर्षी Commonwealth of Learning, Canada या संस्थेचा ‘Award of Excellence for Institutional Achievement’ हा पुरस्कार विद्यापीठाला मिळाला. दोन वेळा असा पुरस्कार मिळणारे हे जगातील एकमेव विद्यापीठ आहे. तसेच नॅक कडून विद्यापीठाला ‘ए’ श्रेणी प्राप्त झाली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची (Distance Education) आहे. विद्यापीठाने राज्यभर विखुरलेल्या अभ्यासकेंद्रांमार्फत अध्ययनार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

## २. विद्याशाखा परिचय

विद्यापीठात एकूण बारा विद्याशाखा आहेत. शिक्षणशास्त्र विद्याशाखा त्यातील एक महत्वाची शिक्षणशास्त्र विद्याशाखा आहे. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत म्हणजे १९९० मध्ये या विद्याशाखेने नावारूपाला येण्याच्या दृष्टीने पावले उचलली. १९९१ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी. एड. १९९४ मध्ये एम. एड. ‘आशययुक्त अध्यापन पद्धती’ तर १९९९ पासून ‘बालसंगोपन आणि रंजन प्रमाणपत्र शिक्षणक्रम’, स्वयं-सहाय्यता प्रेरक-प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम, मूल्यशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम, घरकामगार कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम, शालेय व्यवस्थापन पदविका, बी. एड. (विशेष शिक्षण), एम. ए. शिक्षणशास्त्र आणि पीएच. डी. शिक्षणशास्त्र हे शिक्षणक्रम सुरू केले. ज्याआधारे विद्यापीठाला तळागाळातील लोकांपर्यंत बहुसंख्येने पोहोचणे शक्य झाले. त्या दृष्टीने विद्याशाखेने स्वतःची उद्दिष्टे, व्रतविधानही तयार केले आहे. या विद्याशाखेतील सर्वांत महत्त्वाचा मानला जाणारा हा सेवांतर्गत शिक्षक-प्रशिक्षण (बी. एड.) शिक्षणक्रम आहे. या विद्याशाखेच्या बी. एड. आणि एम. एड. शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी श्रीमती. स्वाती वानखेडे यांना Commonwealth of Learning, Canada या संस्थेने ‘Award of Excellence for Distance Learning Experience’ हा पुरस्कार २००४ साली दिला आहे.

## ३. हा शिक्षणक्रम कोणासाठी

ज्यांनी डी. एड. / डी. टी. एड. पूर्ण केलेले आहे, असे प्राथमिक सेवांतर्गत शिक्षक या शिक्षणक्रमास पात्र असतील.

## ४. एन. सी. टी. ई. प्रवेश नियम

NCTE ने प्रसिद्ध केलेल्या भारताच्या राजपत्रातील २०१४ परिशिष्ट क्र. १० मुद्दा क्र. ४.२ मध्ये पुढील नियमांनुसार बी. एड. प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित केली जाते.

**“Eligibility”**

The following categories are eligible to be students of B.Ed. Open Distance Learning (ODL):

i. Trained in-services teachers in elementary Education/

ii. Candidates who have completed a NCTE recognized teacher's education programme through face-to-face mode/

iii. The reservation and relaxation in marks for SC/ST/OBC/PWD and other categories shall be as per the rules of the Central Government, whichever is applicable."

**अ) आरक्षण तक्ता**

| सामाजिक आरक्षण | | | | समांतर आरक्षण | |
|---|---|---|---|---|---|
| **अ क्र.** | **प्रवर्गनिहाय टक्केवारी** | **एकूण जागा** | **जनरल** | **महिला ३०%** | **दिव्यांग ५%** |
| १ | अनु.जाती १३% | ५ | ४ | १ | आजी माजी सैनिक २%<br>अनाथ १% |
| २ | अनु. जमाती ०७% | ३ | २ | १ | |
| ३ | विमुक्त जाती (अ) ०३ % | १ | १ | ० | |
| ४ | भटक्या जमाती (ब) २.५% | १ | १ | ० | |
| ५ | भटक्या जमाती (क) ३.५ % | २ | १ | १ | |
| ६ | भटक्या जमाती (ड) ०२ % | १ | १ | ० | |
| ७ | इतर मागास प्रवर्ग १९% | ८ | ६ | २ | |
| ८ | EWS १०% | ४ | ३ | १ | |
| ९ | SEBC | शासन नियमानुसार | | | |

उपरोक्त सर्व आरक्षण महाराष्ट्र शासन नियमानुसार भरण्यात येईल.

## ५. जिल्हानिहाय जागा

एन. सी. टी. ई. ने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी. एड. शिक्षणक्रमाला एकूण १५०० जागांना मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याला ४१/४२ जागा भरण्यात येतात.

## ६. अतिरिक्त जागा

**(६.१) सिंधुदुर्ग (गोवा), कोल्हापूर (बेळगाव) व लातूर (बिदर):** सिंधुदुर्ग (गोवा), कोल्हापूर (बेळगाव) व लातूर (बिदर) या महाराष्ट्राच्या सीमारेषे नजीकच्या मराठी भाषिक शिक्षकांसाठी **प्रत्येक ५०० अध्ययनार्थ्यांमागे एक जागा देण्यात येईल.** सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांचा एक संच तयार ठेवावा. प्रवेश मुलाखतीच्या वेळी त्याचा पडताळा घेण्यात येईल. नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी / हिंदी / इंग्रजीतच असावेत. इंग्रजी वा मराठीत नियुक्ती आदेश व अनुभव दाखले नसतील तर त्याची मराठीत अधिकृत भाषांतर प्रत आणावी. त्यावर मुख्याध्यापकाची सही व शिक्का असणे अनिवार्य आहे.

## ७. आरक्षण

शासन नियमानुसार व विद्यापीठ ठरावानुसार खालीलप्रमाणे अतिरिक्त व राखीव जागा राहतील.

**७.१** महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी ५०% जागा राखून ठेवलेल्या आहेत. या जागा शासनाच्या निर्णयानुसार भरण्यात येतील.

१. एन. सी. टी. ई. च्या मान्यतेनुसार एकूण जागा = १५००
२. एकूण अभ्यासकेंद्र = ३६
३. प्रत्येक अभ्यासकेंद्रावर प्रवेश संख्या = ४१/४२

**(७.२) विशेष मागास प्रवर्गाबाबत (SBC) :** गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या **जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण** प्रवेश क्षमतेच्या जास्तीत-जास्त २% पर्यंत विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

आरक्षणाच्या जागांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराच्या बी. एड. प्रवेश मुलाखतीच्या वेळी शासन निर्णयानुसार जातीचे मूळ प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र तसेच ना-सायस्तर प्रमाणपत्र (Non-Creamy layer) **(दि.०१/०४/२०२५ नंतरचे)** अनिवार्य असेल.

ज्या विशेष मागास प्रवर्गातील उमेदवाराकडे महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम. ३३९७\१२९२६/ (९०८६) ताशि-१ दि. ११ जुलै १९९७ च्या शासन निर्णयानुसार मुद्दा क्र. १ नुसार OBC प्रवर्गाचे प्रमाणपत्र व ना-सायस्तर प्रमाणपत्र असेल, त्यांनाच OBC प्रवार्गामधून प्रवेश देण्यात येईल. OBC प्रवर्गाचे प्रमाणपत्र व ना-सायस्तर प्रमाणपत्र नसल्यास त्यांना SBC प्रवर्गाच्या उपरोक्त नियम क्र. ३ व ४ नुसार प्रवेश देण्यात येईल. सदरची प्रमाणपत्रे प्रवेश अर्ज पडताळणीच्या वेळी वैध असावीत.

तसेच शासन निर्णय क्र. एसटीसी-१००१/बी. एड. प्रवेश (२४/२००१) माशि – ३ दि. ३० जानेवारी २००१ मधील तरतूद क्र. ३.५ अन्वये विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना संबंधित सक्षम अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र योग्य त्या पद्धतीचा अवलंब करून देण्याबाबतचा उल्लेखानुसार कार्यवाही होईल.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि – १ दि. ११ जुलै १९९७ च्या शासन निर्णयातील पान क्र. २ मुद्दा क्र. १. **"विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या, त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवाराची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी समजण्यात यावी."**

Government of Maharashtra STATE COMMON ENTRANCE TEST CELL, Information Brochure for Centralized Admission Process (CAP), Academic Year : 2024-25 माहितीपुस्तिकेमधील पान क्र. ११, मुद्दा क्र. **'d' Provision for Special Backward Class : Some of the casted under SBC category were earlier included in Other Backward Categoried. There fore, Such SBC candidate shall be held eligible for reservation in the backward class in which they were included previously.**

अर्जदार मूळ ज्या राखीव प्रवर्गातील होता आणि त्या प्रवर्गाला लागू असणारे सर्व कागदपत्रे अर्जदाराकडे असल्यास, त्याने मूळ प्रवर्गातच अर्ज भरावयाचा आहे. मुलाखतीच्या वेळी त्याच्या मूळ प्रवर्गास लागू असणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

अर्जदाराकडे मूळ प्रवर्गासाठी लागू असणारे कागदपत्रे नसतील, तर त्याने SBC मधून अर्ज करावा. SBC प्रवर्गाच्या संदर्भातील कागदपत्रे त्यांच्याकडे असावेत.

**(७.३) सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाबाबत (SEBC) :** महाराष्ट्र राज्य अधिनियम क्र.१६ दि.२६ फेब्रुवारी २०२४ नुसार, महाराष्ट्र शासन, समान्य प्रशासन विभाग,शा.नि.क्र.बी.सी.सी. २०२४/ प्र.क्र.७५ / १६ क नुसार व महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनाच (उच्च शिक्षण) याच्या दि.१८ जून २०२४ च्या परिपत्रक जा.क्र. उशिसं/मवि-१/ परिपत्रक/ २०२४/ ३२७० नुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) वर्गाकरिता १०% आरक्षण प्रवेशासाठी लागू करण्यात आलेले आहे. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता जात

प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, तसेच उन्नत व प्रगटाचे तत्व लागू असेल आणि ज्या व्यक्ती उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील व्यक्तींनाच केवळ या अधिनियमाखाली आरक्षण देण्यात येईल.

**(७.४) शासन निर्णयानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ३०% जागा महिला अर्जादारांसाठी राखीव राहतील.**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.जीईसी.-१००० (१२३/२०००ताशि-१) दि.१७ एप्रिल २००० च्या नुसार महिला सुरुवातीला आल्या तरी त्यांना महिला म्हणूनच प्रवेश देण्यात येईल. वरील आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे, ज्या प्रवर्गातून उमेदवाराने प्रवेश अर्ज भरलेला असेल, त्यांना त्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात येईल व त्या प्रवर्गातील ती जागा कमी करण्यात येईल. वरील प्रकारच्या उमेदवारांनी सामाजिक आरक्षणातून प्रवेश अर्ज भरलेला असल्यास, सबंधित प्रवर्गाचे आवश्यक ते प्रमाणपत्र त्याच्याकडे असणे अनिवार्य आहे. त्या प्रवर्गातील महिला उपलब्ध नसल्यास ती जागा प्रथम त्या-त्या वर्गातील पुरुषांना देण्यात येईल.

**(महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२ दि.०४ मे २०२३ च्या शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना खुल्या प्रवर्गातून आरक्षित असलेल्या महिलांच्या जागेसाठी नॉन-क्रिमिलिअर प्रमाणपत्र अट रद्द करण्यात आलेली आहे.)**

**टीप :** आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**(७.५) दिव्यांग व्यक्तींच्या प्रवेशासंदर्भात :-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३, प्रसिद्ध दिनांक २७ ऑगस्ट २०१८ नुसार दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षणासाठी शासनाने ५% आरक्षण ठेवलेले आहे. ते पुढीलप्रमाणे असेल. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील अर्जदारांची जनरल गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. गुणवत्तेनुसार गुणवत्ता यादीत येणा-या दिव्यांगांना वगळून, दिव्यांगाच्या गुणवत्ता यादीत १% शारीरिक दिव्यांगत्व, १% बौद्धिक अक्षमता, १% मानसिक वर्तणूक, १% दिव्यांगत्व येण्याचे कारण, १% बहु दिव्यांगत्व या दिव्यांगांचा समावेश असेल. जिल्हानिहाय गुणवत्ता यादी असल्याने प्रत्येक जिल्ह्यास **किमान २** किंवा **कमाल ३** जागा दिल्या जातील. अशा एकूण ७५ जागा संपूर्ण महाराष्ट्रात दिव्यांगांसाठी शासन नियमानुसार राखीव असतील.

सदरील आरक्षण देताना काही जिल्ह्यातून दिव्यांगांचे अर्ज कमी असतात, तर काही जिल्ह्यातून ते नसतात. त्यामुळे ज्या जिल्ह्यात दिव्यांगत्त्वाचे अर्ज कमी असतील किंवा नसतील, ती जागा इतर जिल्ह्यांच्या गुणवत्तेनुसार देण्यात येईल. दिव्यांगांचे आरक्षण अंतर्गत असल्यामुळे प्रथम गुणवत्तेनुसार या जागा भरल्या जातील व भरलेल्या जागा ज्या संवर्गाच्या असतील तेवढ्या जागा नियमित प्रवेशाच्या जागांमधून कमी होतील.

**७.६) बी. एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी UDID (Unique Disability Identity Card) प्रमाणपत्र संदर्भात :** दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार दिव्यागांचे ५ प्रकार व त्यात २१ उपप्रकार करण्यात आलेले आहे. सेवांतर्गत बी. एड्. शिक्षणक्रम प्रवेश प्रक्रियेत ५% समांतर आरक्षण दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार आहे. सेवांतर्गत बी. एड्. शिक्षणक्रमासाठी दिव्यागांचे ५ प्रकार आणि त्यातील उपप्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

| क्र. | दिव्यांग प्रकार | दिव्यांग उपप्रकार |
|---|---|---|
| १ | १ % शारीरिक दिव्यांगत्व | • Blindness or Low Vision (अल्पदृष्टी)<br>• Speech and Language Disability (बोलणे आणि भाषा कमतरता)<br>• Leprosy cured person (कुष्टरोग बरा झालेला व्यक्ती)<br>• Cerebral Palsy (सेरेब्रल पाल्सी)<br>• Hard of Hearing (ऐकण्यात कमजोरी)<br>• Muscular Dystrophy (स्नायू डिस्ट्रॉफी)<br>• Locomotor or disability (लोको मोटर अपंगत्व)<br>• Acid Attack Victims (ॲसिड आघातबळी)<br>• Dwarfism (बुटकेपणा)<br>• Deaf (बहिरा)<br>• Physical Disabilities (शारीरिक दिव्यांगत्व) |
| २ | १ % बौद्धिक अक्षमता | • Autism Spectrum Disorder (ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर)<br>• Specific Learning Disabilities (विशिष्ट गोष्टी शिकण्यातील अपंगत्व)<br>• Intellectual Disability (बौद्धिक अपंगत्व) |
| ३ | १% मानसिक वर्तणूक | • Mental illness (मानसिक आजार)<br>• Mental Behavior (मानसिक वागणूक) |
| ४ | १ % बहु दिव्यांगत्व | • Thalassemia (थैलेसीमिया)<br>• Haemophillia (हीमोफिलिया)<br>• Parkinsons Disease (पार्किन्सन रोग)<br>• Sickle Cell Disease (सिकलसेल रोग)<br>• Multiple Sclerosis (मल्टीपल स्केलेरोसिस)<br>• Disabilities Caused (अपंगत्व येण्याचे कारण) |
| ५ | १ % दिव्यांगत्व येण्याचे कारण | • Multiple Disabilities (बहु अपंगत्व) |

महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग, शासन परिपत्रक सांकेतांक २०२४०६२७१३१९५३४०३५ नुसार दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वासंदर्भातील सर्व लाभ मिळविण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card- UDID) बंधनकारक आहे. बी.एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card- UDID) अनिवार्य आहे.

**(७.७) सैनिक :** सैन्यदलातील आजी व माजी कर्मचारी / पत्नी किंवा त्यांचा मुलगा / अविवाहित मुलगी यांना २% जागा राखून ठेवल्या जातील.

- ज्या जिल्ह्यात आजी / माजी सैनिक प्रवेश अर्ज नसतील, त्या जागा अर्ज असलेल्या जिल्ह्यातून समांतर आरक्षणाच्या नियमाप्रमाणे एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास गुणवत्तेनुसार २% जागा भरण्यात येतील.
- प्रत्येक जिल्ह्याला आजी / माजी सैनिकाचे किमान एक जागा देण्यात येते. ३० जागा पूर्ण न झाल्यास, ज्या केंद्रात एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज असतील त्यांचा गुणवत्तेनुसार प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

**(७.८)** स्वातंत्र्य सैनिक पती / पत्नी, मुलगा / अविवाहित मुलगी तसेच भूकंप व प्रकल्पग्रस्त आणि विधवा व परितक्ता या संवर्गासाठी अतिरिक्त २ गुण देण्यात येतील.

**(या व्यतिरिक्त प्रत्यक्ष प्रवेश प्रथम फेरीची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी प्रसिद्ध होणारे महाराष्ट्र शासनाचे GR सर्व प्रवेशेच्छुक अर्जदारांना त्या वर्षीच्या प्रवेशासाठीही बंधनकारक असतील.)**

**(७.९) अनाथ व्यक्तींच्या १% आरक्षणासंदर्भात :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आलेला अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३ दिनांक ६ एप्रिल २०२३, शासन निर्णय सांकेतांक २०२३०४०६१३४५५५५०३० नुसार अनाथांना उपलब्ध जागांच्या १ % इतके आरक्षण लागू करण्यात आले आहे. बी. एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी अनाथ व्यक्तींना १ % समांतर आरक्षणातून आरक्षण देण्यात येईल.

## ८. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता

**किमान पात्रता**

**(८.१)** यू .जी. सी. मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी / पदव्युत्तर पदवी.

**(८.२)** पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षेत खुल्या प्रवर्गातील अर्जदारांना किमान ५०% (**४९.५% ते ५०% पर्यंतचे गुण**) व मागासवर्गीय अर्जदारांना किमान ४५% (**४४.५% ते ४५% पर्यंतचे गुण**) गुण असणे अनिवार्य आहे. (**महाराष्ट्र शासनाने ज्या प्राथमिक शिक्षकांना पदवीधर श्रेणी Scale लागू केली आहे, अशा अर्जदारांना पदवी / पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्णतेच्या गुणांची अट नाही, मात्र उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.)**

**(८.३)** डी. एड. / डी. टी. एड. हे शिक्षणक्रम पूर्ण केलेले आणि मान्यताप्राप्त प्राथमिक स्तरावर शासनाने मंजूर केलेल्या पदावर पूर्णवेळ / अर्धवेळ काम करणाऱ्या व किमान दोन वर्षाचा (अर्धवेळ असल्यास ४ वर्षे) अनुभव असलेल्या शिक्षकांना सेवाज्येष्ठतेनुसार प्रवेश मिळेल.

**(८.४)** प्रवेशासाठी किमान दोन वर्षांचा अनुभव अनिवार्य असेल. पूर्णवेळ / अर्धवेळ सेवेत असल्याचे व शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत सेवेत ठेवले जाईल, असे शाळाप्रमुखांचे प्रमाणपत्र देऊ शकणाऱ्या पदवीधर शिक्षकांना या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

## ९. प्रवेश अपात्रता

पुढील प्रकारचे अर्ज अपात्र ठरतात. तशी आवेदनपत्रे प्राप्त झाल्यास ती रद्द करण्यात येतील व अर्जदारास याबाबत कळविले जाणार नाही.

- ९.१) ज्यांच्या सेवा आदेशात प्राथमिक शिक्षक नियुक्ती असा उल्लेख नाही.
- ९.२) सध्या सेवेत असलेल्या शाळेच्या जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातून प्रवेश अर्ज भरणारे.
- ९.३) अपूर्ण आणि खोट्या माहितीचे प्रवेश अर्ज.
- ९.४) सध्या सेवेत नसलेले शिक्षक.
- ९.५) तासिका वेतनावर कार्यरत शिक्षक.
- ९.६) यु.जी.सी. मान्यता नसलेल्या विद्यापीठाचे पदवीधारक.
- ९.७) पदवी वर्षाच्या अंतिम परीक्षेस बसलेले, परंतु निकाल न लागल्यामुळे पदवी परीक्षेचे पदवी प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिकेची सत्यप्रत न जोडणारे शिक्षक.
- ९.८ ) बालवाडीत शिकविणारे शिक्षक.

९.९) प्रवेश-अर्जावर मुख्याध्यापकाची सही नसणारे तसेच सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र न जोडणारे अर्जदार प्रवेशास अपात्र ठरतील. मात्र मुख्याध्यापकच स्वतः उमेदवार असेल, तर संस्थेचे सचिव वा शिक्षणाधिकारी यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

९.१०) मराठीचे पुरेसे ज्ञान नसलेले अध्ययनार्थी अपात्र ठरतील.

९.११) राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र / जात पडताळणी प्रमाणपत्र / ना-सायस्तर नसल्याचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी मुदतीत सादर करू न शकणारे उमेदवार राखीव प्रवर्गातून प्रवेशास अपात्र ठरतील.

९.१०) बी. एड. शिक्षणक्रम प्रवेशासाठी अर्ज करणारे उमेदवार हे प्राथमिक शिक्षक असतात. काही शिक्षकांचे वार्षिक उत्पन्न हे आठ लाखापेक्षा अधिक असते, तरी देखिल EWS प्रमाणपत्र शासनाने प्राधिकृत अधिकाऱ्याकडून EWS चे प्रमाणपत्र प्राप्त करून, प्रवेश मिळवतात. **मात्र बी. एड. प्रवेशासाठी खोटे प्रमाणपत्र देऊन EWS या प्रवर्गातून प्रवेश घेतल्यास, उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल. अर्जदाराने भरलेले बी. एड. शिक्षणक्रमाचे शुल्क परत केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

## १०) प्रवेश-अर्ज कसा भरावा?

**अर्जदाराने बी. एड. प्रवेश-अर्ज ऑनलाईन भरायचा आहे. त्यामुळे माहिती पुस्तिका बारकाईने वाचून मगच ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. प्रवेश-अर्ज भरतेवेळी अर्जदार राखीव प्रवर्गातील असेल, तर जात प्रमाणपत्र, जात पडताळणी दाखला किंवा ना सायस्तर (Non-Creamy layer) प्रमाणपत्रावरील दिनांक व इतर माहिती ऑनलाईन अर्जात भरणे अनिवार्य आहे. बी. एड. कागदपत्र तपासताना तीच माहिती ग्राह्य धरली जाईल इ. आरक्षणा संदर्भातील सर्व कागदपत्रे अर्जदाराजवळ असणे आवश्यक आहे. नेट बँकिंगद्वारे प्रोसेसिंग शुल्क भरल्यानंतर अर्जदाराला प्रवेश अर्ज यशस्वीपणे भरला गेल्याचा संदेश येईल. ज्या अर्जदाराला अर्ज यशस्वीपणे भरल्याचा संदेश येईल तेवढेच अर्ज प्रवेशासाठीच्या प्रक्रियेत विचाराधीन असतील, याची नोंद घ्यावी. प्रवेश पात्रतेच्या माहितीत अर्जदाराने काही चूक केल्यास, सदर अर्जदार अर्जदारांच्या यादीत नसेल. तसेच प्रवेश-अर्ज भरतेवेळी गुणवत्ता यादीवर परिणाम करणा-या घटकांबाबत अर्जदाराने केलेली चूक, अपूर्ण माहिती व पुरविलेली खोटी माहिती अर्जदारास प्रवेश प्रक्रियेतून बाद करू शकते. तसेच खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश घेतल्याची तक्रार विद्यापीठाला कधीही प्राप्त झाली व त्या तक्रारीत तथ्य आढळल्यास सदर अर्जदाराचा प्रवेश रद्द होऊन शुल्कही परत केले जाणार नाही. तसेच संबंधित अर्जदारावर शासन नियमानुसार FIR दाखल केला जाईल, याचीही नोंद घ्यावी. प्रवेश-अर्ज ऑनलाईन भरण्याची जबाबदारी व भरलेला अर्ज बरोबर आहे का? ते तपासण्याची जबाबदारी पूर्णतः अर्जदाराची आहे.**

**(१०.१)** बी. एड. प्रवेशासाठी आपणाला ऑनलाईन अर्ज भरावा लागतो. ऑनलाईन भरलेल्या संगणकीय अर्जाच्या आधारेच गुणवत्ता यादी तयार केली जाते. त्यामुळे ऑनलाईन अर्ज बिनचूक भरणे आवश्यक आहे.

**(१०.२)** ऑनलाईन संगणक अर्ज कोठेही जमा करू नये, विभागीय केंद्रावर प्रत्यक्ष प्रवेश अर्ज पडताळणी करतेवेळी सदर अर्ज व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सोबत आणावीत.

**(१०.३)** संगणक अर्जात लिहिलेला अनुभव, पदवी व पदव्युत्तर पदवीच्या गुणांची टक्केवारी (**गुण**) आणि प्रवर्गाच्या आरक्षणाआधारेच प्रवेश अर्ज पडताळणी यादी निश्चित होते. प्रवेश पडताळणी यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी अर्जदारांना एकदा आपल्या भरलेल्या प्रवेश अर्जातील त्रुटी दूर करण्याची संधी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर देण्यात येते. त्यानंतर कोणत्याही स्वरूपाची तक्रार (ऑब्जेक्शन) विचारात घेतली जात नाही.

विभागीय केंद्रावर प्रवेश अर्जात भरलेल्या माहितीची पडताळणी करूनच गुणवत्ता यादीनुसार प्रवेश कायम करण्यात येतो. अर्जदाराने दिलेली माहिती किंवा कागदपत्रे खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास, सदर अर्जदाराचा प्रवेश रद्द करून, शुल्कही परत केले जात नाही. तसेच त्यावर फौजदारी गुन्हाही दाखल करण्यात येतो याची नोंद घ्यावी .

**(१०.३.१)** सेवांतर्गत बी. एड्. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी खालील तीन प्रकारापैकी एका प्रकारचे पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या गुणपत्रकात टक्केवारी, CGPA असल्यास त्यांची टक्केवारी काढताना पुढील नियम वापरावे.

| **गुणनोंदणी प्रकार** | **प्रवेश अर्जात नोंदणी** |
|---|---|
| फक्त टक्केवारी | गुणपत्रकातील टक्केवारी लिहिणे. |
| CGPA + टक्केवारी | गुणपत्रकातील टक्केवारी लिहिणे. |
| CGPA | CGPA **X**10-7.5 सूत्राचा वापर करून टक्केवारी काढणे. |

अर्जदार अगोदर टी. वाय (T.Y) उतीर्ण, त्यानंतर एफ. वाय (F.Y) आणि एस. वाय (S.Y) उतीर्ण झालेला असल्यास त्यांनी संबधित विद्यापीठाकडून एकत्रित गुणपत्रक घ्यावे.

- CGPA वरून टक्केवारी काढण्याचे 7.5-10**X** CGPA हे सूत्र मुक्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असल्यास वापरण्यात यावे.
- इतर विद्यापीठांमध्ये CGPA देऊन गुणपत्रकाच्या मागील बाजूस CGPA वरून टक्केवारी काढण्याचे सूत्र असल्यास उमेदवाराने त्या पद्धतीने टक्केवारी काढावी.
- इतर विद्यापीठांमध्ये CGPA देऊन गुणपत्रकाच्या मागील बाजूस CGPA वरून टक्केवारी काढण्याचे सूत्र नसल्यास उमेदवाराने संबंधित विद्यापीठाकडून टक्केवारी काढून त्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

**(१०.४)** शिक्षक म्हणून अनुभव लिहितांना तो **दि. ३० एप्रिल २०२५** पर्यंतचा नोंदवावा. संगणक अर्जावर केवळ तुमच्या एकूण सेवा कालावधीची **(पुरावे सादर करू शकत असलेल्या)** नोंद करावी. **एकूण सेवा अनुभवाची नोंद करताना अर्जदाराने** नोकरीसंदर्भात सुरुवातीपासून **अर्जदाराकडे उपलब्ध असलेल्या** पुराव्याप्रमाणे नोंद करावी. **अनुभवाचा पुरावा म्हणून सेवेचे प्रमाणपत्र हे दस्तऐवज मान्य करण्यात येत नाही.** ज्या सेवेचे पुरावे **उदा.** सेवा पुस्तिकेतील नोंद, नियुक्ती आदेश इ. उमेदवाराकडे नाहीत त्याची नोंद संगणकीय अर्जातील **अनुभव नोंद तक्त्यात** करू नये.

**(१०.५)** पूर्वीची सेवा अर्धवेळ असल्यास **अनुभव नोंद तक्त्यात** अनुभव नोंदविताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. यासंदर्भात 'शिक्षणक्रम प्रवेश पात्रता' मुद्दा क्र. ८. ३ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(१०.६)** संगणक प्रवेश अर्जावरील 'जिल्हा' या ठिकाणी तुम्ही ज्या शाळेत सेवेत असाल त्या शाळेचा जिल्हा नोंदवावा. अर्जदाराची शाळा ज्या जिल्ह्यात असेल त्याच जिल्ह्यात अर्जदाराला प्रवेश घेता येतो. बी. एड. चे प्रवेश हे जिल्हानिहाय  तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार दिले जातात.

**(१०.७)** अर्जदाराने ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीचे पुरावे कागदपत्र पडताळणीच्यावेळी संबंधित समितीला अर्जदाराने सादर करणे अनिवार्य असते.

**(१०.८) कागदपत्र पडताळणीच्या गुणवत्ता यादीत प्रवेशासाठी निवड झाल्यास अर्जदाराने आपण Online अर्जात भरलेल्या सर्व माहितीचा पुरावा देणारे तसेच सेवा सत्यता पडताळणीसाठीची प्रमाणित कागदपत्रे** विभागीय केंद्रावर होणाऱ्या कागदपत्र पडताळणीसाठी **सोबत आणावीत. ती न**

**आणल्यास अर्जदाराची कागदपत्र पडताळणी होणार नाही आणि संबंधित अर्जदार प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडेल याची नोंद घ्यावी.**

- **मूळ प्रवेश अर्ज व ऑनलाईन संगणकीय अर्जाची प्रत आणि डी. एड./ डी. टी. एड./ उत्तीर्णतेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र**
- **शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्रांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती.**
- **प्रवेश-अर्जात नोंद केल्याप्रमाणे प्रत्येक विद्यालयातील सुरुवातीपासून पुढील सर्व नेमणुकीच्या आदेशांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती, तसेच अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र.**
- **मागासवर्गीय असल्यास पुढे नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत.**
  - **अनुसूचित जाती (एस. सी.) — जातीचा दाखला**
  - **अनुसूचित जमाती (एस. टी.) — जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र**
  - **विमुक्त जमाती / भटक्या जाती / इतर मागासवर्गीय / विशेष मागासवर्गीय**
- **(VJ/NT/OBC/SBC) जातीचा दाखला, ऑनलाईन संगणकीय अर्जात नमूद केलेल्या नावाचे अर्जावर असलेल्या नावाचे वैध कालावधीचे ना सायस्तर-प्रमाणपत्र (नॉन-क्रिमिलियर) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. बी. एड. कागदपत्र तपासताना तीच माहिती ग्राह्य धरली जाईल, पोचपावती ग्राह्य धरली जाणार नाही. (आरक्षण शासन निर्णयानुसार बदल होऊ शकतात.)**
- **SEBC व आर्थिकदृष्ट्या दुर्बल आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांसाठी त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न संबंधित वर्षात ८ लाखापेक्षा कमी असल्याचा संबंधित अधिकाऱ्याचा प्रमाणित दाखला.**
- **जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कोणत्याही प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.**
- **सर्व सेवेचे नेमणूक आदेश, शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांच्या शिक्षक किंवा पदमान्यता पत्राच्या सुरुवातीपासूनच्या सर्व साक्षांकित प्रती, शाळा मान्यतापत्र.**
- **मेंटॉर (वरिष्ठ शिक्षक) मान्यता प्रमाणपत्र.**
- **शाळा अनुदानित असेल तर वर्षनिहाय शाळा तपासणी अहवालाच्या साक्षांकित प्रती.**
- **सेवापुस्तिकेतील संबंधित नोंदी. (संपूर्ण सेवापुस्तिकेची साक्षांकित केलेली झेरॉक्स प्रत)**
- **नावात बदल असल्यास नाव बदल पुरावा म्हणून राजपत्र.**
- **समांतर आणि अतिरिक्त गुण आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांना**
  - **दिव्यांग :** किमान ४० % दिव्यांग असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र.
  - **आजी / माजी सैनिक पाल्य :** सैनिकाची पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांना जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र आवश्यक, नातेसंबंधाचा पुरावा आवश्यक, डिस्चार्ज पुस्तक आवश्यक.
  - **अनाथ :** अनाथ असल्यास विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) विभाग यांचे अनाथ प्रमाणपत्र आवश्यक. **(अनाथ प्रमाणपत्र वितरीत करताना अनाथ मुलगा/मुलगी ज्या प्रवर्गातील (अ, ब आणि क) असेल त्या सबंधित नमुन्याचा वापर करण्यात यावा.)**
    ***(संदर्भ :** महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-२०१८-/प्र.क्र.१८२/का-०३, दि. २३ ऑगस्ट २०२१, शासन निर्णय संकेतांक २०२१०८२३१६०३१०३८३०)*
  - **प्रकल्पग्रस्त :** जिल्हा पुनर्वसन अधिकारी / सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र, परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.
  - **आपत्तीग्रस्त :** उपविभागीय अधिकारी / तहसीलदार यांचे प्रमाणपत्र, परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.
  - **विधवा :** महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त झालेले पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.

- **घटस्फोटिता :** विवाहनोंदणी दाखला किंवा न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश किंवा मुस्लीम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी / इमामांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र, ते प्रमाणपत्र नोटरी करून मराठी भाषेत भाषांतर करून आणणे आवश्यक.
- **सिंधुदुर्ग (गोवा), कोल्हापूर (बेळगाव) व लातूर (बिदर):** हा मराठी भाषिक प्रदेश असल्याने या उमेदवारांनी नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी / हिंदी / इंग्रजीत आणावे व त्यावर संबंधित अधिकारी / मुख्याध्यापकाची सही व शिक्का आणणे अनिवार्य असेल.
- **मुलाखतीच्या वेळी वरील मूळ व साक्षांकित (Attested) प्रमाणपत्रांच्या आधारे उमेदवाराच्या प्रवेश-अर्जातील माहितीची सत्यता पडताळून पाहण्यात येईल. त्यामुळे उपरोक्त आवश्यक ती कागदपत्रे उमेदवाराजवळ जवळ नसल्यास प्रवेश दिला जाणार नाही.**

**(१०.०९)** संगणक अर्जातून प्राप्त माहितीच्या आधारे प्रवेश अर्ज पडताळणी यादी तयार करण्यात येईल. त्या यादीतील अर्जदारांनी प्रवेशासंदर्भात आपल्या विभागीय केंद्रावर कागदपत्र पडताळणीसाठी नियोजित वेळेत सर्व मूळ कागदपत्रासह उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

**(१०.१०)** केंद्रनिहाय ४१/४२ प्रवेशेच्छुकांची प्रवेश निवड यादी (खुला, राखीव प्रवर्ग व सामाजिक आरक्षण) प्रवेशासाठी जाहीर करण्यात येईल. प्रवेश गुणवत्ता यादीतील ज्या अर्जदारांची कागदपत्रे बरोबर आहेत त्याच अर्जांचा प्रत्यक्ष प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

संबंधित अर्जदारांनी प्रवेश निवड यादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रवेशाशी संबंधित डी. यू. पोर्टलवरील अर्ज भरणे, शुल्क भरणे व आपला प्रवेश नियोजित वेळेत अंतिम करणे अपेक्षित असेल. अर्थात विद्यापीठाच्या धोरणानुसार त्यात होणारा सर्व बदल अर्जदारांना बंधनकारक असेल. त्यासंदर्भात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रवेश गुणवत्ता यादी सोबत सूचना दिली जाते. प्रवेश निवड यादी वेळापत्रकासह संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते, ती बघणे अर्जदाराची जबाबदारी असेल. नियोजित वेळेत प्रवेश न घेणाऱ्या अर्जदाराच्या जागी त्याच प्रवर्गातील प्रवेश निवड यादीतील पुढील अर्जदार प्रवेश अर्ज पडताळणीसह पुढील फेरीत भरण्यात येतील. निवड यादी केवळ विद्यापीठ संकेतस्थळावरच टाकण्यात येईल.

**लक्षात ठेवा –** विभागीय केंद्रावर प्रवेश अर्ज पडताळणीसाठी जाताना मुद्दा क्र. १०.८ मध्ये नमूद केलेली तसेच प्रवेश- अर्जात भरलेल्या माहितीचा पुरावा देणारी सर्व मूळ कागदपत्रे अर्जदाराने आणणे बंधनकारक आहे. अर्जदाराजवळ उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारेच त्याच्या अर्जाचे पडताळणी करून प्रवेश गुणवत्ता यादीत नाव समाविष्ट केले जाते. राखीव गटातून अर्ज करणाऱ्या अर्जदाराकडे शासनाने निर्धारित केलेली वैध कागदपत्रे असणे बंधनकारक असेल. कागदपत्र पडताळणीच्यावेळी **Online** प्रवेश अर्जातील भरलेली माहिती व अर्जदाराजवळ उपलब्ध असलेले पुरावे यांची तपासणी करण्यात येते.

**(१०.११)** प्रवेश अर्ज पडताळणीनंतर निवड यादीत अर्जदाराचे नाव असल्यास अर्जदाराने नियोजित वेळी शुल्क भरण्यापूर्वी डी. यू. पोर्टलवरील अर्जदार माहितीचा (Authentication) फॉर्म भरणे अनिवार्य असेल.

**(१०.१२)** प्रत्येक जिल्ह्यासाठी निर्धारित जागा आहेत. प्रवेश अर्जाअभावी त्या भरल्या न गेल्यास त्या विभागातील उर्वरित जिल्ह्यांच्या संबंधित प्रवर्गातील सर्व अर्जदारांची एकत्रित गुणवत्ता यादी तयारी करून गुणवत्तेनुसार संबंधित प्रवर्गातील उर्वरित जागा नव्याने तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील अर्जदारांच्या जिल्ह्यातच अतिरिक्त जागा म्हणून भरण्यात येतील. हे करताना त्या जिल्ह्यातील जागा ५० पेक्षा जास्त होणार नाही, याची खबरदारी घेण्यात येईल.

**(१०.१३)** बी. एड. २०२५-२७ शिक्षणक्रमाच्या प्रवेशासंदर्भात आपल्या काही तक्रारी असल्यास त्या **b.ed_adm@ycmou.ac.in** या ई-मेल आयडीवर पाठवाव्यात. प्रवेशासंदर्भातील तक्रार अर्जाची विद्यापीठ पडताळणी करून योग्य तो निर्णय घेईल. मात्र प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर आलेल्या तक्रार अर्जांवर विचार केला जाणार नाही.

**या शिक्षणक्रमासाठीच्या निवड यादीबाबत अर्जदारांना केवळ विद्यापीठ संकेतस्थळावरूनच कळवले जाईल. तसेच सदर याद्या विद्यापीठ संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध करण्यात येतील. तसा मेसेज अर्जदाराला प्रवेशासाठी भरलेल्या ऑनलाईन प्रवेश अर्जात नोंदविलेल्या मोबाईलवर पाठविण्यात येईल. बी. एड. प्रवेशासाठी विद्यापीठ संकेतस्थळ पाहण्याची जबाबदारी अर्जदाराची असेल.**

**(१०.१४)** प्रवेश अर्ज व त्याची सहपत्रे अर्जदाराने ज्या शैक्षणिक तुकडीसाठी सादर केले असतील तर, त्या तुकडीच्या प्रवेशासाठीच वैध असतील.

**(१०.१५)** संगणकीय अर्जात जिल्हा संकेतांकाची चुकीची नोंद केल्यास अर्जदाराचा प्रवेशासाठी विचार होणार नाही. यासाठी संगणकीय अर्जात अर्जदाराने आपली शाळा, शाळेचा तालुका व जिल्हा याची नोंद अचूक करावी. बी. एड. प्रवेश याद्या जिल्हानिहाय असल्याने अर्जदाराच्या शाळेची निवड त्याचा तालुका वा जिल्हा चुकीचा नोंदविला, तर अर्जदाराचे अभ्यासकेंद्र बदलते. वेगळ्या जिल्ह्यात अर्जदाराला प्रवेश दिला जात नसल्याने सदर अर्जदाराचा दुसऱ्या जिल्ह्यात प्रवेश झाल्यास तो रद्द केला जातो व शुल्क ही परत केले जात नाही.

**लक्षात ठेवा** – अर्जदाराने बी. एड. शिक्षणक्रमाला अभ्यासकेंद्रावर प्रवेश घेतल्यानंतर आपल्या Online अर्जाची प्रिंट, प्रवेश शुल्काची ई-चलन पावती आपल्या नोंदणीकृत मेल-आयडीवर प्राप्त होईल. तसेच त्याची प्रत स्वतःकडे ठेवणे आवश्यक आहे.

**महत्त्वाचे** – प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यानुसार वेळोवेळी दिलेल्या कार्यवाही संदर्भातील सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर पहाव्यात.

## (११) निवड-प्रक्रिया

**(११.१)** सदर शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादी तयार करताना केवळ ऑनलाईन संगणकीय अर्जात भरलेल्या माहितीचा विचार केला जातो. **उदाहरणार्थ :** सेवाज्येष्ठता, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि अतिरिक्त पदवीचे गुण इत्यादी. आरक्षणासंदर्भात संगणक अर्जातील माहिती व शासन नियमांचे पालन करण्यात येते.

**(११.२)** प्रवेश गुणवत्ता यादी करताना प्रथम अनुभवानुसार पायाभूत गुण देण्यात येतात. २०२५-२७ तुकडीसाठी सेवा अनुभव नोंदवण्याचा **दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत** असेल. **प्रत्येक वर्षासाठी एक गुण असे एकूण जितक्या वर्षांचा अनुभव असेल तितके गुण मिळतील.** एका वर्षापेक्षा कमी कालावधीचे गुण ठरवतांना जर अनुभव सहा महिने किंवा अधिक असेल तर एक गुण धरण्यात येईल. त्यापेक्षा कमी महिन्यांच्या सेवेला गुण देण्यात येणार नाहीत. अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांची शिक्षणक्रम प्रवेश पात्रता मुद्यांतर्गत दिल्याप्रमाणे विचारात घेतली जाईल. प्रवेशासाठी मराठीचे पुरेसे ज्ञान अर्जदाराकडे असणे अनिवार्य आहे, त्यासंदर्भात कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.

**(११.३) शैक्षणिक पात्रता वर्ग / श्रेणी निहाय गुणदान पद्धती**

**अ)** 'डी. एड. / डी. टी. एड. पदविका शिक्षणक्रम उत्तीर्णता,' या शिक्षणक्रमाची अर्हता असल्याने संबंधित शिक्षणक्रम उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र प्रवेशाच्या वेळी सादर करणे अनिवार्य असेल. मात्र त्यास कोणतेही अतिरिक्त गुणदान नसेल.

**ब)** पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा पदवीनंतरची अतिरिक्त एक वर्षाची पदविका **किंवा** पीएच. डी. पदवी उत्तीर्ण असणाऱ्या अर्जदाराला त्यात मिळालेल्या गुणांनुसार खालीलप्रमाणे गुण दिले जातात. मात्र त्यासाठी अर्जदाराने त्यासंदर्भातील माहिती ऑनलाईन अर्जात संबंधित रकान्यात भरलेली असणे अनिवार्य असते.

| **अ. क्र.** | गुणांच्या टक्केवारीनुसार खालीलप्रमाणे गुण प्राप्त होतील. | **पदवी**<br>**उदा.** बी.ए., बी. कॉम., बी. एस्सी. | **पदव्युत्तर पदवी**<br>**उदा.** एम.ए., एम. कॉम., एम. एस्सी. (एकापेक्षा अधिक पदव्युत्तर पदव्या असतील तर एकाच पदवीचे गुण धरले जातील.) | **पदवीनंतरची अतिरिक्त एक वर्षाची पदविका किंवा पदवी**<br>**उदा.** (बी. पी. एड., डिप्लोमा इन पॉप्युलेशन एज्युकेशन, डिप्लोमा इन ॲडल्ट एज्युकेशन., डी. एस. एम.) |
|---|---|---|---|---|
| १ | ३९.५ - ४९.४९ | ० गुण | ३ गुण | ३ गुण |
| २ | ४९.५० - ५९.४९ | ४ गुण | ४ गुण | ४ गुण |
| ३ | ५९.५० - ७४.४९ | ५ गुण | ५ गुण | ५ गुण |
| ४ | ७४.५० - त्यापेक्षा जास्त | ६ गुण | ६ गुण | ६ गुण |

**वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रतेच्या वर्ग / श्रेणीनुसार गुण प्राप्त होण्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी संबंधित शिक्षणक्रम उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. शिक्षणक्रम / परीक्षा प्रवेशित स्थितीतील माहिती भरू नये.**

**सूचना :** जे अर्जदार पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय श्रेणीमुळे प्रवेशास पात्र होतील त्यांना संबंधित पदव्युत्तर पदवीचे गुण देण्यात येणार नाहीत.

**(११.४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास बी. एड. प्रवेशासाठी गुणवत्ता यादीमध्ये मिळणारे अतिरिक्त गुण** खालीलप्रमाणे प्राप्त होतील. मात्र ऑनलाईन प्रवेश अर्जात त्यासंदर्भातील योग्य माहिती भरणे अनिवार्य आहे. एका पातळीवरील एकापेक्षा अधिक शिक्षणक्रम पूर्ण केलेले असले तरी, प्रत्येक स्तरावरील एकाच शिक्षणक्रमाचे गुण प्रवेशासाठीच्या गुणवत्ता यादीसाठी ग्राह्य धरण्यात येतील. मात्र Online प्रवेश अर्ज भरतेवेळी संबंधित शिक्षणक्रमाचे उत्तीर्णतेचे गुणपत्रक अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे.

| **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास अतिरिक्त बी. एड. प्रवेशासाठी मिळणारे गुण** | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रमाणपत्र शिक्षणक्रम (किमान ६ महिने कालावधी असणे आवश्यक) | पदविका शिक्षणक्रम | पदवी शिक्षणक्रम | पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम | **संशोधन पदवी**<br>एम. फील. / पीएच. डी. संशोधन शिक्षणक्रम |
| **२ गुण** | **३ गुण** | **४ गुण** | **५ गुण** | **६ गुण** |

**(११.५) प्रवेश प्रक्रिया**

प्रवेश अर्ज पडताळणी गुणवत्ता यादी तयार करताना यशस्वीपणे भरलेल्या Online अर्जांचाच विचार करण्यात येईल. कागदपत्रांची पडताळणी विभागीय केंद्रावर करण्यात येईल. त्यानंतर प्रवेश गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. त्यात प्रथमतः समांतर आरक्षण, खुला प्रवर्ग व नंतर राखीव जागांचे प्रवेश होतील. एखाद्या मागासवर्गीय घटकासाठी पुरेसे अर्जदार उपलब्ध न झाल्यास त्या जागा पुढील फेरीत नियमानुसार व गुणवत्तेनुसार इतर मागासवर्गीयांच्या यादीतून संक्रमित पध्दतीने भरण्यात येतील. त्यासाठी शासन नियमानुसार पुढीलप्रमाणे जागांचे संक्रमण असेल.

**गट अ** – अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST)

**गट ब** – विमुक्त जाती (VJ-A) व भटक्या जाती (NT-B)

**गट क** – भटक्या जमाती (NT-C) व भटक्या जमाती (NT-D) इतर मागासवर्गीय (OBC) उमेदवारांचा समावेश असेल.

**संदर्भ** : शा.नि.क्र. टी.ई.एम.-२००६/(३०६/०६) तांशी- १, दि.६ जुलै २००६ (अध्यादेश २००६ ची अधिसूचना). दिव्यांग / आजी-माजी सैनिक / गोवा (सिंधुदुर्ग), बेळगाव (कोल्हापूर) व बिदर (लातूर) त्या त्या संवर्गातील किमान गुणांखेर आरक्षित जागांवर पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा संवर्गानुसार मुक्त समजण्यात येतील व त्या संवर्गातील मूळ गटास दिल्या जातील. त्यानंतरही राखीव प्रवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास त्या सर्वसाधारण गटातून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. नविन शासन निर्णय (GR) निघाल्यास त्यानुसार यात बदल करण्यात येईल.

**(११.६)** प्रवेश गुणवत्ता यादीत जर समान गुण असतील तर प्रथम अनुभवाचा आणि नंतर वयानुसार ज्येष्ठता विचारात घेतली जाईल. जर वय समान असेल तर ज्यांनी पदवी अगोदर प्राप्त केली असेल त्यांना प्राधान्य मिळेल. त्यानंतरही समान गुण झाल्यास गुणवत्ताक्रम ठरविण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील व तो अंतिम असेल.

**(११.७) पदवीधर वेतन श्रेणीबाबत** – RTE २००९ च्या नियमानुसार २०१४ नंतर डी. एड. असणाऱ्या शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. **मात्र नियुक्ती आदेशात बी. एड्. करणे अनिवार्य आहे, असा उल्लेख केलेला नसल्यामुळे,** पदवीधर वेतनश्रेणीच्या आदेशात इयत्ता ६ वी ते ८ वीच्या वर्गावरील पदवीधर शिक्षकांना देय असलेल्या वेतनश्रेणी संदर्भातील शासन परिपत्रक क्र. वेतन / १२१६ प्र. क्र. १६ टी.एन.टी. – ३, दिनांक १३ ऑक्टोबर २०१६, विज्ञान विषय प्रवर्ग (गणित/ विज्ञान/ अभियांत्रिकी) भाषा विषय प्रवर्ग (मराठी/ इंग्रजी/ हिंदी/ उर्दू) सामाजिकशास्त्र (इतिहास/ भूगोल) मुद्दा क्र. ५ मध्ये पदवीधर आणि डी. एड्./बी. एड्. असा उल्लेख केलेला असल्यामुळे, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ प्रमाणे पदवीधर वेतनश्रेणी प्राप्त असणा-या व पदवीधर वेतनश्रेणीच्या आदेशात **बी. एड्. शिक्षणक्रम ५ ते ७ वर्षात पूर्ण करण्याची अट असलेल्या आणि नसलेल्या उमेदवारांना (शिक्षकांना) पदवीधर वेतन श्रेणीचे प्रतिवर्षी १ याप्रमाणे मिळणारे अतिरिक्त गुण देण्यात येणार नाही.**

सदर माहिती बरोबर भरण्याची / तपासण्याची पूर्णतः जबाबदारी अर्जदाराचीच असेल. त्यासंदर्भात कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ५ वी ते १०/१२ वी वर्ग असलेल्या माध्यमिक शाळेत डी. एड. स्केलवर कार्यरत अथवा माध्यमिक शिक्षक नियुक्ती असूनही ५ वी ते ७ वी इयत्तांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना त्यामुळे शासन परिपत्रकानुसार पदवी आणि डी. एड. उमेदवारही पदवीधर वेतनश्रेणीसाठी पात्र आहे.

**पुन्हा एकदा महत्त्वाचे - शहरी, ग्रामीण, आदिवासी विभाग, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या सर्व अर्जदारांसाठी महत्त्वपूर्ण सूचना :-** प्रवेश प्रक्रियेतील कोणतीही सूचना अर्जदारांना पोस्टाने कळविले जाणार नाही. त्यासाठी केवळ संकेतस्थळाचाच वापर करण्यात येईल. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशासाठी निवड झालेल्यांची यादी पाहायला मिळेल. जवळच्या सायबर कॅफेतून ती प्राप्त करता येईल. अर्जदाराने ती न पाहिल्यास त्यास अर्जदार जबाबदार असाल. तसेच अशा अर्जदारांना नंतरच्या फेरीतही प्रवेश गुणवत्ता यादीत कागदपत्र पडताळणीसाठी निवड केली जाणार नाही.

**(११.८) यादीमध्ये नाव आहे की नाही ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कसे पाहाल ?**

* विद्यापीठाच्या Home page **https://ycmou.digitaluniversity.ac** वर बी. एड. प्रवेश प्रक्रिया या पेजवर **Click** करा. त्यानंतर पुढे कसे जावे याबाबतच्या सूचना अर्जदारास बघायला मिळतील. त्या वाचून त्याप्रमाणे कृती करा, म्हणजे आपण आपल्या नावापर्यंत पोहोचाल.

**(११.९)** बी. एड. प्रवेशानंतर अर्जदाराने प्रवेश अर्जात नोंदवलेल्या मोबाईलवर **Password** येईल. त्यावर अर्जदाराने **Profile** तपासून पाहावे. अभ्यासक्रम निवड, नावाच्या संदर्भात जर काही त्रुटी असतील तर तातडीने विभागीय केंद्रावर संपर्क साधावा. प्रोफाईल तपासणीसाठी दिलेल्या मुदतीनंतर कोणत्याही प्रकारची माहिती / अभ्यासक्रम बदल होत नाही याची नोंद घ्यावी.

**(११.१०) बी. एड. ला प्रवेश घेणाऱ्या अध्ययनार्थीला बी. एड. च्या द्वितीय वर्षासाठी पुन्हा Online प्रवेश अर्ज भरून आपला प्रवेश निश्चित करणे अनिवार्य आहे. दुसऱ्या वर्षी आपला बी. एड. प्रवेश पुन्हा निश्चित न करणारे अध्ययनार्थी दुसऱ्या वर्षाची अंतिम परीक्षा देण्यास अपात्र ठरतात, याची कृपया नोंद घ्यावी.**

**महत्वाची सूचना-** शासनाने वेळोवेळी काढलेले शासन निर्णय (जी.आर.) व विद्यापीठाचे धोरणात्मक निर्णय प्रवेश प्रक्रियेपूर्वी प्राप्त झाल्यास त्यानुसार केलेला नियमावलीतील बदल सर्व प्रवेशार्थ्यांना बंधनकारक असेल.

## (१२) बी. एड. शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रम

अनिवार्य अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य विद्यापीठ मुख्यालयातून विभागीय केंद्राकडे व विभागीय केंद्राकडून अभ्यासकेंद्रांकडे पुरविण्यात येईल. अभ्यासकेंद्रावरून अध्ययनार्थ्यांना अध्ययन साहित्य प्राप्त होईल. वैकल्पिक अभ्यासक्रम व पूरक अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रम पूर्ततेसाठी त्याचा उपयोग करावा. अध्ययन साहित्य प्राप्ती संदर्भात काही अडचणी असल्यास विद्यापीठाच्या ग्रंथ भांडार कक्ष प्रमुखांशी संपर्क साधावा. त्यांचा Email ID **ycmoustore@gmail.com** असा आहे.

**अ) प्रथम वर्ष :**

| अ.क्र | अनिवार्य अभ्यासक्रम (अधिष्ठान अभ्यासक्रम ) | वैकल्पिक अभ्यासक्रम खालीलपैकी कोणतेही दोन अभ्यासक्रम शालेय विषय (मेथड) निवडावेत. (प्रथम अभ्यासक्रम पदवी स्तरावर अभ्यासलेला असावा. द्वितीय अभ्यासक्रम आपण आपल्या आवडीनुसार घेऊ शकाल.) |
|---|---|---|
| १ | EDU 401 अध्ययनार्थी व त्याचा विकास | EDU 405/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : मराठी |
| २ | EDU 402 अध्ययन आणि अध्यापन | EDU 406/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : हिंदी |
| ३ | EDU 403 अभ्यासक्रम आणि भाषा | EDU 407/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : इंग्रजी |
| ४ | EDU 421 मूल्यमापन आणि मूल्यनिर्धारण | EDU 408/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : संस्कृत |
| ५ | **क्रेडीट कोर्स** — CRD001 योग शिक्षण | EDU 409/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : इतिहास |
| ६ | | EDU 410/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : भूगोल |
| ७ | | EDU 411/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : गणित |
| ८ | | EDU 412/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : विज्ञान |
| ९ | | EDU 413/437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : अर्थशास्त्र |
| १० | | EDU 414/437 शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : हिशेबशास्त्र |

(एन.सी.टी.ई. नियम व विद्यापीठ धोरणांनुसार या रचनेत होणारा बदल सर्व अध्ययनार्थ्यांना बंधनकारक असेल.)

**सूचना - एकदा निवडलेली अध्यापन पद्धती बदलता येत नाही याची नोंद घ्यावी. त्यामुळे संगणक अर्जात अध्यापन पद्धती नोंदवताना काळजीपूर्वक नोंदवावी.**

**(ब) द्वितीय वर्ष :**

| अ. क्र. | अनिवार्य अभ्यासक्रम | वैकल्पिक अभ्यासक्रम (खालीलपैकी कोणताही एक विषय निवडावा.) |
|---|---|---|
| १ | EDU 422 : समकालीन भारतीय समाज आणि शिक्षण | EDU 426 : शैक्षणिक तंत्रविज्ञान |
| २ | EDU 423 : लिंग, शाळा आणि समाज | EDU 427 : बालक आणि बालशिक्षण (भाग - १ व भाग - २) |
| ३ | EDU 424 : ज्ञान आणि अभ्यासक्रम | EDU 428 : शिक्षक आणि स्वयं-साहाय्य गट (भाग- १ व भाग - २) |
| ४ | EDU 425 : सर्व समावेशित शिक्षण | EDU 429 : मूल्यशिक्षण |
| ५ | **(क्रेडिट कोर्स)** EVS 201 : पर्यावरण अभ्यास | EDU 430 : प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी |
| ६ | | EDU 433 : शिक्षणातील संज्ञापन प्रकार |
| ७ | | EDU 434 : प्राथमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्ये |
| ८ | | EDU 435 : माध्यमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्ये |
| ९ | | EDU 436 : शिक्षणाच्या बदलत्या भूमिका व कृतिशीलता |
| १० | | EDU 437 : शालेय विषयाचे अध्यापनशास्त्र : विशिष्ट शालेय विषय |

**प्रात्यक्षिक कार्याबाबत :**

| प्रथम वर्षे — प्रात्यक्षिक कार्य | द्वितीय वर्षे — प्रात्यक्षिक कार्य |
|---|---|
| सैद्धांतिक विषयाशी संबंधित प्रात्यक्षिके | सैद्धांतिक विषयाशी संबंधित प्रात्यक्षिके |
| स्वशोध क्षेत्राशी संबंधित प्रात्याक्षिके | सरावपाठ संबंधित प्रात्यक्षिके |
| नाट्य व कला क्षेत्राशी संबंधित प्रात्यक्षिक | सहशालेय उपक्रम |
| कृतिसंशोधन व योगा प्रात्यक्षिके | शालेय व्यवहारांवरील विमर्षण |
| वाचन व विमर्षण संबंधित प्रात्यक्षिके | आंतरवासिता |
| संगणक संबंधित प्रात्यक्षिके | पर्यावरण शिक्षण |
| आंतरवासिता | |

(एन.सी.टी.ई. नियम व विद्यापीठ धोरणांनुसार या रचनेत होणारा बदल सर्व अध्ययनार्थ्यांना बंधनकारक असेल.)

**सूचना :- प्रवेश निश्चितीनंतर कोणत्याही अभ्यासक्रमात / वैकल्पिक अभ्यासक्रमात / अध्यापन पध्दतीच्या अभ्यासक्रमात बदल केला जात नाही, ह्याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. त्यामुळे संगणक अर्जात विषयांची नोंद करताना काळजीपूर्वक करावी.**

## (१३) संपर्कसत्रे - रोज घड्याळी ६ तास याप्रमाणे

| | |
|---|---|
| प्रथम वर्षे — ३५ दिवस | द्वितीय वर्षे — ३५ दिवस |

**(१३.१) संपर्कसत्र कार्यक्रम व त्यातील उपस्थिती** — शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्त्विक पाठ्यक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली प्रात्यक्षिके पूर्ण करणे, स्वाध्यायांवरील प्रत्याभरण, कृतिसत्रे, उद्बोधन, प्रबोधन इत्यादींसाठी योजनाबद्ध संपर्कसत्रांची आवश्यकता आहे. ही संपर्कसत्रे विद्यापीठाच्या या शिक्षणक्रमाच्या नियोजित अभ्यासकेंद्रावर **Online/Offline** पद्धतीने आयोजित केले जातात. आपल्या नियुक्त अभ्यासकेंद्रावरच अध्ययनार्थ्यांनी ते पूर्ण करणे बंधनकारक आहे. अभ्यासकेंद्रासाठी एन. सी. टी. ई. मार्फत राज्यातील प्रथितयश शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड करण्यात आलेली आहे. विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार या संपर्कसत्राचे आयोजन करण्यात येते. संपर्कसत्रातील अध्ययनार्थ्यांची उपस्थिती व सहभाग त्यात अनिवार्य असतो.

**(१३.२)** संपर्कसत्रांना अनुपस्थित राहणाऱ्या अध्ययनार्थ्यांना विद्यापीठाकडे केंद्रामार्फत अर्ज केल्यानंतर विद्यापीठाच्या मान्यतेनुसार प्रत्येक दिवसाला रु. ५००/- याप्रमाणे विद्यापीठात ज्यादा शुल्क भरावे लागते. ज्यादा शुल्कातील ६०% रक्कम विद्यापीठात, तर ४०% रक्कम अभ्यासकेंद्रासाठी घेण्यात येईल. त्यानंतर विद्याशाखेच्या मान्यतेनुसार नियुक्त अभ्यासकेंद्रावर अपूर्ण संपर्कसत्र पूर्ण करता येते. अपूर्ण संपर्कसत्र अभ्यासकेंद्रांची तयारी असल्यास त्याच वर्षी अन्यथा पुढील तुकडीच्या संबंधित संपर्कसत्राबरोबर पूर्ण करता येते. सर्व संपर्कसत्र पूर्ण झाल्याशिवाय अध्ययनार्थी अंतिम परीक्षेला पात्र ठरत नाही. काही छोटी संपर्कसत्रे केंद्र कार्यालयीन दिवशी आयोजित करू शकते. तसे झाल्यास त्यास प्रशिक्षणार्थींना रजा घेऊन उपस्थित रहावे लागते. त्याबद्दल कोणतीही तक्रार विचारात घेतली जात नाही.

**(१३.३) परीक्षेचे माध्यम —** प्रात्यक्षिक कार्य व लेखी परीक्षेसाठी इंग्रजी अभ्यासक्रमासाठी माध्यम इंग्रजी, हिंदी अभ्यासक्रमासाठी माध्यम हिंदी व इतर अभ्यासक्रमासाठी माध्यम मराठी राहील. इतर सर्व अभ्यासक्रमांची लेखी परीक्षा व अभ्यासकार्य मराठी भाषेतूनच पूर्ण करावी लागतील. (अपवाद इंग्रजी व हिंदी माध्यमातून लेखन व अंतिम परीक्षेसाठी पूर्वपरवानगी घेणारे अध्ययनार्थी) प्रश्नपत्रिका मराठी आणि इंग्रजी ह्या दोन्ही माध्यमांत उपलब्ध असतील. मात्र मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका प्रमाण मानण्यात येतील.

**सूचना** - प्रवेश निश्चितीनंतर येणाऱ्या पहिल्या मोठ्या सुट्टीत आपले प्रथम मोठे संपर्कसत्र असेल. नियोजित अभ्यासकेंद्राकडून त्यासंदर्भात प्रवेश झालेल्या अध्ययनार्थ्यांना पत्र / मेल / Whatsapp ग्रुपवरून कळविले जाते. तसे संप्रेषण आपणाशी न झाल्यास आपण आपल्या नियोजित अभ्यासकेंद्रावर संपर्क साधावा. अर्थात त्यासाठी प्रवेशानंतर आठ दिवसांत आपले नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, फोन नंबर ई-मेल.आय.डी. इ. ची नोंद आपल्या नियुक्त अभ्यासकेंद्रावर करणे, सर्व संबंधितांना बंधनकारक असेल.

## (१४) अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी

**विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेस पात्र होण्यासाठी अटी पुढीलप्रमाणे :**

**(१४.१)** या शिक्षणक्रमाच्या प्रत्येक संपर्कसत्रात किमान ८०% उपस्थित राहून सर्व प्रात्यक्षिक कार्ये व्यवस्थित पूर्ण केल्याबद्दल एकत्रित असे अभ्यासकेंद्र प्रमुखांचे प्रमाणपत्र छात्राध्यापकाने घेतले पाहिजे.

**(१४.२)** शिक्षणक्रमातील विद्यालयांतर्गत प्रात्यक्षिक कार्याची वेळापत्रकानुसार पूर्तता केल्याबद्दलचे एकत्रित असे विद्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र छात्राध्यापकाने घेऊन स्वतः जवळ ठेवावे.

**(१४.३)** संगणक प्रात्यक्षिक कार्य पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संगणक केंद्र प्रमुखाकडून छात्राध्यापकाने घेऊन स्वतः जवळ ठेवावे.

**(१४.४)** केंद्रावरील मौखिक परीक्षेस उपस्थित असल्याचे प्रमाणपत्र छात्राध्यापकाने घेऊन स्वतः जवळ ठेवावे.

**(१४.५)** अंतिम परीक्षेपूर्वी अध्ययनार्थीने सर्व संपर्कसत्रे व प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करावीत.

**(१४.६)** संपर्कसत्रे व प्रात्यक्षिके कार्य पूर्ण केलेले अध्ययनार्थीच परीक्षेसाठी पात्र असतील. त्या संदर्भातील खात्री केंद्रसंचालक व समन्वयक यांच्याकडून करून घ्यावी, प्रवेशित अध्ययनार्थ्याने नियोजित परीक्षेच्या पहिल्यावेळी परीक्षा अर्ज भरू नयेत. मात्र पुनर्परीक्षार्थीने परीक्षा अर्ज भरणे अनिवार्य आहे.


## (१५) अध्ययनार्थी मूल्यमापन

या शिक्षणक्रमात अंतर्गत व बहिस्थ असे दोन पद्धतीने मूल्यमापन करण्यात येते.

**अ)** सैद्धांतिक अभ्यासक्रमातील अंतर्गत गुणांना ३०% भारांश, तर अंतिम लेखी परीक्षेस ७०% भारांश असतो. प्रत्येक वर्षी अंतिम परीक्षा साधारणत: मे / जून महिन्यात आयोजित केली जाते, त्यात बदल होऊ शकतो.

**आ)** अंतर्गत कार्याचे मूल्यमापन अभ्यासकेंद्रामार्फत सातत्याने चालते. तसेच दरवर्षी मौखिक परीक्षाही आयोजित करून हे मूल्यमापन पूर्ण केले जाते.

### (१५.१) मूल्यमापनाचा तपशील




**(शासन व विद्यापीठ धोरणानुसार यात काही बदल झाल्यास तो सर्व प्रवेशार्थ्यांना बंधनकारक असेल.)**

### (१५.२) उत्तीर्णतेचे नियम

**अ)** तात्त्विक भागात उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक लेखी परीक्षेत किमान ४०% गुण आणि सर्व विषय मिळून किमान ५०% गुण अनिवार्य असतील.

**आ)** प्रात्यक्षिक भागात उत्तीर्ण होण्यासाठी प्रात्यक्षिक कार्यात किमान ५०% गुण अनिवार्य असतील.

**इ)** अध्ययनार्थी तात्त्विक भागात तसेच प्रात्यक्षिक भागात उत्तीर्ण झाला तरच तो या शिक्षणक्रमाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**ई)** अंतिम श्रेणी ही तात्त्विक व प्रात्यक्षिक या दोन्ही भागांवर आधारित असेल व विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे ती निश्चित होईल.

**उ)** प्रात्यक्षिक गुणांवर 'स्केलिंग डाऊन' (प्रमाणीकरण) योजनेनुसार प्रक्रिया करण्यात येईल. अभ्यासकेंद्रावरून प्राप्त झालेले प्रात्यक्षिकाचे गुण जसेच्या तसे शिक्षणक्रमाच्या टक्केवारीसाठी धरण्यात येणार नाहीत. सैद्धांतिक भागात / अंतिम परीक्षेतील गुणांप्रमाणे त्याचे प्रमाणीकरण करण्यात येईल. प्रमाणीकरणात अंतिम परीक्षेत गुण आणि प्रात्यक्षिकात मिळालेले गुण यात १५% पेक्षा जास्त फरक असेल तर प्रात्यक्षिकांचे गुण कमी करून तो फरक १५% पर्यंत आणला जाईल. त्यानंतर सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक परीक्षेतील गुणांची मिळून अंतिम एकत्रित टक्केवारी काढण्यात येईल.

**ऊ) अंतिम गुण श्रेणी पुढे दर्शविल्याप्रमाणे दिली जाते.**

| **वर्ग** | **श्रेणी तपशील** | **ग्रेड पॉईंट** |
|---|---|---|
| 'ओ' | विशेष प्रावीण्य | १० |
| 'ए+' | अति उत्तम | ९ |
| 'ए' | उत्तम | ८ |
| 'बी+' | चांगला | ७ |

| | | |
|---|---|---|
| 'बी' | सरासरीपेक्षा वर | ६ |
| 'सी' | साधारण | ५ |
| 'डी' | साधारण | ० |
| 'एफ' | साधारण | ० |

## १६. बी. एड. शिक्षणक्रम शुल्काचे विभाजन –

| अ. क्र. | शिक्षणक्रम शुल्क | प्रथम वर्ष शुल्क | द्वितीय वर्ष शुल्क |
|---|---|---|---|
| | **Part : A** | | |
| 1 | Registration Fees (नोंदणी शुल्क) | 200 | 200 |
| 2 | Eligibility Fee (पात्रता शुल्क) | 100 | - |
| 3 | Identity Card Fee (ओळखपत्र शुल्क) | 10 | - |
| 4 | Prospectus Fee (माहितीपुस्तिका शुल्क) | 100 | - |
| 5 | E-Suvidha/E-Services Fee (ई-सुविधा शुल्क) | 70 | 70 |
| 6 | Library Fee (ग्रंथालय शुल्क) | 10 | 10 |
| 7 | Chalncellor's Office Events Fees (कुलपती कार्यालय कार्यक्रम शुल्क) | 38 | 38 |
| 8 | Sports Fees (क्रीडा शुल्क) | 50 | 50 |
| 9 | DSW Fees (बहिस्थ विद्यार्थी कल्याण शुल्क) | 50 | 50 |
| 10 | Disastar Management Fees (आपत्ती व्यवस्थापन शुल्क) | 10 | 10 |
| 11 | NSS Fees (एन.एस.एस शुल्क) | 10 | 10 |
| 12 | Alumni Fees (ॲल्युमनी शुल्क) | - | 10 |
| 13 | Sanvad Fees (संवाद पत्रिका शुल्क) | 10 | 10 |
| 14 | Graduation/Convocation Fees (दीक्षांत समारंभ शुल्क) | - | 450 |
| 15 | Student Insurance Fees (विद्यार्थी विमा शुल्क) | 20 | 20 |
| | **Total : (प्रथम वर्ष + द्वितीय वर्ष)** | 678 | 928 |
| | **Part : B** | | |
| 16 | **Tuition Fees**<br>• विद्यापीठ शुल्क (प्रथम वर्ष रु. 11,002 + द्वितीय वर्ष रु. 11,002)<br>• अभ्यासकेंद्र शुल्क (प्रथम वर्ष रु. 10,500 + द्वितीय वर्ष रु. 10,500) | 11,002/-<br>10,500/- | 11,002/-<br>10,500/- |
| 17 | Exam Fees (परीक्षा शुल्क) (प्रथम वर्ष रु. 1,200 + द्वितीय वर्ष रु. 1,000) | 1,200/- | 1,000/- |
| | **Total : Part A + Part B (प्रथम वर्ष + द्वितीय वर्ष)** | 23,380/- | 23,430/- |

**सूचना – प्रथम वर्षाचे शुल्क प्रवेश निश्चितीच्यावेळी Online पद्धतीने घेण्यात येईल.**

**द्वितीय वर्ष बी. एड. प्रवेशित अध्ययनार्थ्याने द्वितीय वर्षाचे प्रवेश अर्ज Open झाल्यानंतर दिलेल्या मुदतीत Online अर्ज भरून, द्वितीय वर्षाचे शुल्क Online पद्धतीने भरणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर अध्ययनार्थी द्वितीय वर्षात प्रवेशित होणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**सूचना - १) विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार शैक्षणिक वर्षे २०२३ पासून शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क (विद्यापीठ शुल्क + अभ्यासकेंद्र शुल्क) हे विद्यापीठाकडे ऑनलाईन पध्दतीने जमा केले जात आहे. त्यामुळे बी. एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या अध्ययनार्थींनी कोणत्याही प्रकारचे शुल्क अभ्यासकेंद्रावर भरू नये.**

**जे अध्ययनार्थी द्वितीय वर्षासाठी मूल्यशिक्षण हा वैकल्पिक अभ्यासक्रम निवडतील, त्यांना द्वितीय वर्षास प्रवेश घेतेवेळी रु. ६१०/- अधिकचे शुल्क भरावे लागेल. त्यांतून त्यांना बहाई अकादमी पाचगणी यांच्याकडून अध्ययनसाहित्य पाठविले जाईल.**

एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव आपणास परत केले जाणार नाही. या व्यतिरिक्त अभ्यासकेंद्रावर तेथील ग्रंथालय नियमानुसार अनामत रक्कम आपणास भरावी लागेल. ग्रंथालय अनायत रक्कम शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर आपणास अभ्यासकेंद्रांकडून परत करण्यात येईल, त्याचीही रितसर पावती अभ्यासकेंद्रांवरून मिळेल.

**महत्त्वाचे –**

- **या व्यतिरिक्त कोणत्याही स्वरूपाचे शुल्क किंवा रक्कम अभ्यासकेंद्राकडून घेतले जाणार नाही. अभ्यासकेंद्राकडून पावती न मिळाल्यास किंवा अतिरिक्त रक्कम घेतल्यास विद्यापीठ मुख्यालयातील मा. कुलसचिव कार्यालयात लेखी तक्रार करावी.**
- **प्रवेशानंतर या पुस्तिकेत दिलेले सर्व नियम व अटी प्रवेशित अध्ययनार्थ्यास बंधनकारक असतील, याची नोंद घ्यावी.**

## १७. Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits-ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती Digi Locker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी श्रेयांक (Credit) ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits-ID नोंदणी http://www.abc.go.in या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या संकेतस्थळावरील Student Zone या बटनावर क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits-ID तयार करण्यासंबंधित माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी संकेतस्थळावर उपलब्ध केलेले आहे. त्यानुसार ABC -ID तयार करावा.

**१८. विभागनिहाय व जिल्हानिहाय अभ्यासकेंद्रे** - विद्यापीठाच्या या पदवी शिक्षणक्रमासाठी एन.सी.टी.ई. मान्यता असणारी एकूण ३६ अभ्यासकेंद्रे आहेत, प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे त्यांची विभागणी आहे. मुंबई विभागातील मुंबई (उपनगर) -(बोरिवली (URC-1), कांदिवली (URC-2), गोरेगाव (URC-3), अंधेरी (URC-4), सांताक्रूझ (URC-5), भांडूप (URC-6), घाटकोपर (URC-7), चेंबूर (URC-8), कुर्ला (URC-9),घाटकोपर (DYD_URC-3),अंधेरी (DYD_URC-5), मालाड W (DYD_URC-6), कांदिवली E (DYD_URC-7), ह्या तालुक्यांचा समावेश होतो त्यांच्यासाठी चेंबूर येथे अभ्यासकेंद्र आहे. मुंबई शहरात सेवा करणाऱ्यांसाठी एस.टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय धोबीतलाव येथे अभ्यासकेंद्र आहे. तसेच रायगड जिल्ह्यासाठी पनवेल येथे स्वतंत्र अभ्यासकेंद्र आहे.

इतर जिल्ह्यांप्रमाणेच मुंबई विभागातील अर्जदारांनीही आपण मुंबईच्या ज्या भागात सेवा करतो त्याच विभागातील अभ्यासकेंद्र निवडणे बंधनकारक आहे. ती निवड चुकली अथवा एकापेक्षा जास्त केंद्रावर प्रवेश-

अर्ज भरला तर प्रवेश मिळणार नाही. चुकून प्रवेश झाला तर तो रद्द करण्यात येईल व आपण भरलेले शुल्कही परत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

मुंबई तसेच इतर कोणत्याही विभागात एखाद्या जिल्ह्यात प्रवेश-अर्जाअभावी नियोजित संख्येपेक्षा कमी प्रवेश झाल्यास त्या जिल्ह्याच्या रिक्त जागा संबंधित विभागीय केंद्रातील उर्वरित जिल्ह्यात, नियमांनुसार वाटप करण्यात येतील. त्या जिल्ह्यात त्या जागा गुणवत्तेनुसार अतिरिक्त भरण्यात येतील.

**तक्ता क्रमांक १ : प्रवेशासाठी जिल्हानिहाय अभ्यासकेंद्र**

| अ. क्र | अर्जदाराच्या शाळेचा जिल्हा | जिल्हानिहाय निश्चित केलेले अभ्यासकेंद्र | | पडताळणीसाठी निश्चित केलेले विभागीय केंद्र |
|---|---|---|---|---|
| | | संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता | |
| ०१ | अकोला | 1121A | शासकीय अध्यापक महाविद्यालय रामदास पेठ, अकोला दु.नं. (०७२४) २४३३७६५ | य.च.म.मु.वि. विभागीय केंद्र अमरावती व्ही. एम. व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही. एम. व्ही, नवसारी अमरावती. पिन कोड - ४४४ ६०४ दू.क्र: (०७२१) २५३१४४५२५३१२१०. |
| ०२ | अमरावती | 1250A | शिवाजी शिक्षण संस्थेचे शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजीनगर डॉ. पंजाबराव देशमुख चौक जि. अमरावती - ४४४ २१४ दु.नं. (०७२१) २६६२१४२ | |
| ०३ | बुलढाणा | 1302A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, चिखली रोड बुलढाणा - ४४३ ००१ दु.नं. (०७२६२) २४४३४२ | |
| ०४ | यवतमाळ | 1404A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, गोधनी रोड, उमरसा जि. यवतमाळ - ४४५ ००१ दु.नं. (०७२३२) २४४३४२ | |
| ०५ | वाशीम | 1504A | छबुताई डहाके शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशीम दु.नं. (०७२५६) २२३६१२ | |
| ०६ | छ. संभाजी नगर | 2101A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, स्टेशन रोड, छ.संभाजी नगर दु.नं. (०२४०) २३३४८४० | य.च.म.मु.वि. विभागीय केंद्र छ. संभाजी नगर सर्व्हे नं. 41, सैनिकी मुलींच्या वसतिगृहाच्या पूर्वेस संदनवन कॉलनी, छावणी छ. संभाजी नगर. पिन कोड - ४३१ ००२ दू.क्र. (०२४०) २३७१०६६, २३७१०७७ |
| ०७ | बीड | 2203A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड ४३१ २०४ दु.नं. (०२४४६) २४७०५६ | |
| ०८ | जालना | 2303A | मत्सोदरी कॉलेज ऑफ एज्युकेशन, मत्सगड, जालना-४३१२०४ दु.नं. (०२४८२) २३५९३७ | |
| ०९ | धाराशिव | 2601A | स्वामी विवेकानंद संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव -४१३ ५०१ दु.नं. (०२४७२) २२२०५८ | |
| १० | मुंबई सब अर्बन (बोरिवली (URC-1), कांदिवली (URC-2), गोरेगाव (URC-3), अंधेरी (URC-4), | 3102A | चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, राधाकृष्ण चेंबूर मार्गसमोर, चेंबूर नाका चेंबूर, मुंबई ४०००७१ (सबअर्बन) दु.नं.(०२२) २५२२१४३९ | य.च.म.मु.वि. विभागीय केंद्र मुंबई जगन्नाथ शंकरशेठ महानगरपालिका शाळेची इमारत, दुसरा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सांताक्रूझ (URC-5), भांडूप (URC-6),घाटकोपर (URC-7), चेंबूर (URC-8), कुर्ला (URC-9),घाटकोपर (DYD_URC3), अंधेरी (DYD_URC5), मालाड W (DYD_URC6), कांदिवली E (DYD_URC7), हे तालुके असतील. | | | मजला फ्रेअर ब्रीज (साउथ एन्ड) नाना चौक, ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई<br>पिन कोड - ४०० ००७<br>दू.क्र. (०२२) २३८७४१८०, २३८७४१८३, २३८७४१७७ |
| ११ | मुंबई<br>(परेल (URC-10), दादर (URC-11), भायखळा (URC-12), ग्रँटरोड (DYD_URC1), सायन (DYD_URC2), मुलूड (DYD_URC4) हे तालुके असतील.) | 31139 | सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज ऑफ एज्युकेशन ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव मेट्रो सिनेमा, मुंबई – ४०० ००१<br>दु.न. (०२२) २२६२००५० | |
| १२ | रायगड | 3213A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, पुणे-मुंबई हायवे, पनवेल, जि. रायगड – ४१० २०६ दु.नं. : (०२२) २७४५३००० | |
| १३ | ठाणे | 3501A | सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, सेन्ट्रल हॉस्पिटल समोर, सेवासदन मार्ग, उल्हासनगर, जि. ठाणे - ४२१ ००१<br>दु.नं. (०२५१) २५४५५६५ | |
| १४ | पालघर | 37012 | दीप कॅम्पस, बोईसर ए.जी. एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी. एड), साईधाम परिसराच्या मागे, सरावली, बोईसर, जि. पालघर, पिन कोड - ४०१५०४<br>**प्राचार्य :** ९६३७१९६६३२<br>**समन्वयक :** ८८८८७४८४८७ | |
| १५ | भंडारा | 4102A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा – ४४१ ९०४<br>दु.नं. (०७१८४) २५२३८६ | य.च.म.मु.वि. विभागीय केंद्र नागपूर सुभेदार हॉल, विद्यापीठ क्रीडा परिसर लॉ कॉलेज कॅम्पस, रविनगर चौकाजवळ, अमरावती रोड, नागपूर. |
| १६ | गोंदिया | 4104A | पुंजाभाई पटेल कॉलेज ऑफ एज्युकेशन, डॉ. आंबेडकर वार्ड, गोंदिया – ४४१६०१<br>दु.नं. (०७१८२) २२२५०८, २३१६९८ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | चंद्रपूर | 4220A | जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन, सिव्हील लाईन्स, चंद्रपूर – ४४२४४१<br>दु.नं. (०७१७२) २५८७२२, २५५२९२ | पिन कोड – ४४०००१<br>दू.क्र. (0712) 2553724/25 |
| १८ | गडचिरोली | 4302A | शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे ॲड. एन. एस. गंगुवार कोलेज ऑफ एज्युकेशन,गडचिरोली – ४४२ ६०५<br>दु.नं. : (०७१३२) २३३४५३ | |
| १९ | नागपूर | 4484A | राधिका अध्यापक महाविद्यालय, नवोदय विद्यालय बिल्डिंग, राजीवनगर सोमलवाडा, नागपूर – ४४० ०२५<br>दु.नं. : (०७१२) २२९१६८२ | |
| २० | वर्धा | 4501A | स्वावलंबी कॉलेज ऑफ एज्युकेशन, वर्धा – ४४२ ००१<br>दु.नं. : (०७१५२) २४३८०४ | |
| २१ | धुळे | 5201A | धुळे एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, डॉ. लोहिया मार्ग, एस.आर.पी. कॅम्पजवळ,<br>धुळे – ४२४ ००१ .<br>दु.नं. : (०२५६२) २३८०४२ | |
| २२ | जळगाव | 5310A | खान्देश एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन,<br>एम.जे. कॉलेज परिसर जळगाव – ४२५ ००१ दु.क्र. : (०२५७) २२३४१८७ | |
| २३ | नाशिक | 5401A | एन.डी.एम.व्ही.पी.चे कॉलेज ऑफ एज्युकेशन, के.टी.एच.एम. कॉलेज कॅम्पस, गंगापूररोड,<br>नाशिक – ४२२ ००२ .<br>दु.क्र. : (०२५३) २५७१५४२ | |
| २४ | नंदुरबार | 5507A | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार<br>दु.क्र. : (०२५६४) २२२५०८ | |
| २५ | पुणे | 62251 | टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, एस.पी.महाविद्यालय परिसर, १६६३/२,लोकमान्य नगर, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०<br>दु.क्र. : (०२०) २४३३२०३५ | यचममुवि. विभागीय केंद्र पुणे, शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह महानगरपालिका शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग पुणे.<br>पिन कोड – ४११ ०३०<br>दू.क्र. (020)24457914 |
| २६ | अहिल्यानगर | 5116A | विद्या प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, केडगाव देवी रोड अहमदनगर – ४१४ ००१<br>दु.नं. : (०२४१) २५५१४२० | |
| २७ | सातारा | 6401A | आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन कॅम्प, सातारा – ४१५ ००१<br>दु.क्र. : (०२१७) २३१२५७ | |
| २८ | सोलापूर | 6502A | दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर – ४१३ ००२<br>दु.क्र. : (०२१७) २३७३२३७ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | सांगली | 7254A | सांगली शिक्षण संस्थेचे एस.पी.एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन, राजवाडा, सांगली – ४१६ ४१६<br>दु.नं. : (०२३३) २३७३८४८ | यचममुवि. विभागीय केंद्र कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफिस शेजारी, विद्यानगर कोल्हापूर.<br>पिन कोड –४१६ ००४<br>दू.क्र. (0231)-2607022 |
| ३० | रत्नागिरी | 7301A | शासकीय अध्यापन महाविद्यालय बोर्डिंग रोड, रत्नागिरी – ४१५ ६१२<br>दु.नं. : (०२४५२) २२४६५० | |
| ३१ | सिंधुदुर्ग | 7403A | शिक्षण विकास मंडळाचे श्री. एस.के. पंतवालावलकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, देवगड, जि. सिंधुदुर्ग<br>दु.नं. : (०२३६४) २६२१९४ | |
| ३२ | कोल्हापूर | 7515A | आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी, जि. कोल्हापूर<br>दु.नं. : (०२३२४) २२००७९ | |
| ३३ | लातूर | 8416A | वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर, दु.नं. : (०२३८१) २२०२९० | यचममुवि. विभागीय केंद्र नांदेड, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसर,नानक कमान, झरी रोड,विष्णुपुरी नांदेड.<br>पिन कोड - ४२१ ६०६<br>दू.क्र. (02462) 229940 / 283038 |
| ३४ | नांदेड | 8502A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड – ४३१ ६०१<br>दु.नं. : (०२४६२) २२९३२८ | |
| ३५ | परभणी | 8702A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, जिंतूर रोड, परभणी<br>दु.नं. : (०२४५२) २२४००१५ | |
| ३६ | हिंगोली | 8810A | प्रियदर्शनी सेवा संस्थेचे डॉ. शंकरराव सानव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कळमनुरी, जि. हिंगोली – ४३१७०२<br>दु.नं. : (०२४५५) २२००३७ | |

**टीप** - विद्यापीठाने प्रवेश देतेवेळी दिलेले अभ्यासकेंद्र काही कारणांमुळे कार्यान्वित होऊ शकले नाही, तर पर्यायी व्यवस्था करण्यात येईल. त्या ठिकाणी संबंधित अध्ययनार्थ्यांनी शिक्षणक्रम पूर्ण करणे सर्व अध्ययनार्थ्यांना बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

## १९. विशेष नोंदी

बी. एड. शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर प्रवेशित अध्ययनार्थीने पुढील बाबी लक्षात ठेवाव्यात.

**१९.१ अध्ययनार्थीने प्रवेशाच्या वेळी निवडलेल्या अभ्यासक्रमात कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव बदल करण्यास मान्यता देण्यात येणार नाही. कोणी बदल केला व त्यामुळे निकालात चूक झाल्यास त्यास अध्ययनार्थी जबाबदार असेल.**

**१९.२** नावातील स्पेलिंग अथवा देवनागरी अक्षरातील चुका अध्ययनार्थ्याने स्वतः प्रवेशानंतर त्याला त्याची माहिती संपादन करण्यास मिळणाऱ्या वेळेत दुरुस्त करणे अनिवार्य असेल.

**१९.३** जिल्हानिहाय आरक्षण व प्रवेश गुणवत्ता याद्या तयार होत असल्याने एकदा दिलेले अभ्यासकेंद्र बदलून दिले जाणार नाही. अध्यापकास संपूर्ण शिक्षणक्रम आपल्या नियोजित अभ्यासकेंद्रावरच पूर्ण करावा लागेल. केवळ बदली झाल्यास केंद्रबदल अर्ज करावा. तो अर्ज मूळ केंद्र व नवीन केंद्र यांच्या ना हरकत प्रमाणपत्र आणि संमती पत्रासह असावा. सोबत बदली आदेशाची प्रत जोडावी, अर्थात या

परिस्थितीत संबंधित अध्ययनार्थ्याला दोन्ही अभ्यासकेंद्रावर संपूर्ण अभ्यासकेंद्र शुल्क भरणे अनिवार्य असेल. बदली व्यतिरिक्त या संदर्भात येणा-या अर्जांची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही.

**१९.४** विषय बदल असल्यास विहित कालावधीत रु. ५,०००/- भरून विषय बदल करावा लागेल.

**१९.५** अध्ययनार्थीने प्रवेश घेतल्यानंतर त्याला काही कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा असल्यास, त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे प्रवेश रद्द करून शुल्क परताव्या संदर्भातील नियम लागू राहतील.

## २०. संपर्कासाठी पत्ते -

आपल्याला आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी पुढे दिलेल्या संबंधित अधिकारी / विभागास संपर्क करणे आवश्यक असेल. यासाठी विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर दिलेले मेल आयडी / दुरध्वनी क्रमांकांचाही आपण उपयोग करू शकाल.

विद्यापीठातील अधिकारी विविध कामात कार्यरत असल्याने अथवा संपूर्ण महाराष्ट्रातून येणाऱ्या दूरध्वनीमुळे तुमचा फोन लागत नाही. अशावेळी मोबाईल / व्हॉटसअपवर मेसेज न टाकता, ई-मेलद्वारे संपर्क साधावा. मेल आयडी विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर देण्यात आले आहेत.

**संपर्कासाठी संबंधित विभागप्रमुखांचे पत्ते —**

| | |
|---|---|
| **नोंदणी व विद्यार्थी सेवा संदर्भातील समस्या**<br>मा. संचालक विद्यार्थी सेवा विभाग,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक.<br>४२२ २२२<br>**फोन नं. ०२५३-२२३१४७८**<br>**dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac**<br>**नोंदणी कक्ष प्रमुख**<br>**फोन नं. ०२५३-२२३०५८०, २२३१७१५, २२३०१०६, २२३१७१४**<br>**nondani@ycmou.digitaluniversity.ac** | **व्यवस्थापकीय समस्या**<br>मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२<br>**फोन नं. ०२५३-२२३१४७८**<br>**dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac** |
| **शैक्षणिक समस्या**<br>मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा /<br>समन्वयक बी.एड. शिक्षणक्रम<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२२२२<br>**फोन नं. ०२५३-२२३१४७२**<br>**dir_edu@ycmou.digitaluniversity.ac** | **पुस्तकासंदर्भात**<br>मा. प्रमुख, ग्रंथ भांडार<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२<br>**फोन नं. ०२५३-२२३०१०६**<br>**ycmoustore@gmail.com** |
| **न्यायालयीन/प्रवेशासंदर्भातील अडचणी/तक्रारी**<br>मा. कुलसचिव,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक.<br>४२२ २२२**फोन नं. ०२५३-२२३०२२९**<br>**registrar@ycmou.digitaluniversity.ac** | **परीक्षा संदर्भात**<br>मा. परीक्षा नियंत्रक,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२<br>**फोन नं. ०२५३-२२३०७१६/२२३००५८/२२३००१३**<br>**coe@ycmou.ac.in** |

**महत्त्वाचे —** विद्यापीठाशी करावयाचा पत्रव्यवहार पोस्ट/ स्पीडपोस्टनेच करावा. Whatsapp अथवा कुरियरमार्फत करू नये. त्याची दखल घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

## परिशिष्ट – १
## जातीनिहाय आरक्षण जी. आर. नुसार

**१.** खुल्या संवर्गातील ५०% जागा व राखीव संवर्गातील ५०% जागा अंतर्गत स्वतंत्रपणे खालील संवर्गातील उमेदवारांना त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे आरक्षण लागू राहील.

(**अ**) जिल्हा शल्यचिकीत्सक यांनी प्रमाणपत्र दिलेले शारीरिक अपंग असलेले अर्जदार ५% (किमान ४०% प्रमाणित केलेले) (आरक्षण अंतर्गत असेल)

(**आ**) सैन्य दलात सक्रीय सेवेत असलेले (ॲक्टीव्ह सर्व्हिस) व माजी सैनिक यांच्या २% कर्मचाऱ्यांनी मुलगे / अविवाहित मुली व पती / पत्नी

**२. अनाथ असलेल्या व्यक्तीला १% आरक्षण देण्यात येईल.**

**३. मागासवर्गीय उमेदवारांची त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेली साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

अ) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती ) (SC)........ १३ %

आ) अनुसूचित जमाती (ST)........ ७%

इ) विमुक्त जाती (मूळ १४ व तत्सम जाती) (VJ – A)........ ३%

ई) भटक्या जमाती (NT – B) ........ २.५%

**(जानेवारी १९९० पूर्वीच्या व २८ तत्सम जाती + नव्याने समाविष्ट केलेल्या तत्सम जाती)**

गोसावी, बेलदार, भराडी, भुते चलवादी (वगळले), चित्रकथी, गारुडी, घिसाडी, गोल्ला, गोंधळी, गोपाल, हेळवे, जोशी, फासेपारधी (वगळले), कोल्हाटी, मैराळ, मसनजोशी, नंदीवाले, पांगुळ, रावळ, सिक्कलगार, ठाकर, वैदू, वासुदेव, भोई, बहुरूपी, ठेलारी, ओतारी डी. ७ मे २००५ च्या शासन निर्णयानुसार, मरीआईवाले, कडक लक्ष्मीवाले, मरगम्मवाले, गीहरा / गहरा, गुसाई / गोसाई, मुस्लीम मदारी, गारुडी, संपवले व जादुगार, भारतीय इराणी, गवळी, मुस्लीम गवळी, दरवेशी, वाघावले, शाह (मुस्लीम धर्मीय), अस्वलावले, डी. १ मार्च २००६ शासन निर्णयानुसार लोहार व तत्सम जाती, सिक्कलगार व तत्सम जाती.

उ) भटक्या जमाती धनगर व तत्सम जमाती) ( (NT-C) ------------------------------------------- ३.५%

अहिर / डांगे / गढरी / तेलकर / हटकर / हाटकर / शेगर / खुटेकर / तेलंगी / तेल्लारी / कोकणी धनगर / कानडे / वऱ्हाडे / धनगर / झाले झेंडे / कुरमार / माहुरे / लाडसे / सनगर

ऊ) भटक्या जमाती (NT – D) --------------------------------------------------------------- २%

वंजार वंजारा आणि वंजारी

ए) इतर मागासवर्गीय ------------------------------------------------------------------------- १९%

ऐ) SEBC शासन नियमानुसार --------------------------------------------------------------- १०%

ओ) EWS ---------------------------------------------------------------------------------- १०%

**परिशिष्ट – ०२**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम (तुकडी २०२५ – २०२७)**

**अर्जदाराने सादर करावयाचा सेवा तपशील ( Service Record )**

(प्रवेश – अर्जासोबत जोडावयाचे सहपत्र) **सेवा नोंद तक्ता**

---

(१) अध्ययनार्थ्याचे नाव :______________________________

(२) पत्ता :______________________________

______________________________

______________________________

(३) शाळेचा प्रकार : (अ) प्राथमिक ☐

(४)शाळेचा प्रकार : (अ) अनुदानित ☐ (आ) विनाअनुदानित ☐

(५) (अ) पूर्ण वेळ शिक्षक म्हणून प्रवेश अर्ज भरण्यासाठी अंतिम **दिनांक ३० एप्रिल २०२५** हा असेल.

(६) निर्दिष्ट केलेल्या सेवेचा तपशील : ☐ वर्षे ☐ महिने

| **क्र.** | **विद्यालयाचे नाव** | **शिकविलेले / शिकवीत असलेले वर्ग** | **सेवेचा कालावधी** | | **वर्षे** | **अध्यापनाचे विषय** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **पासून** | **पर्यंत** | | |
| १. | | | - - १९ | - - १९ | | |
| २. | | | - - २० | - - २० | | |
| ३. | | | - - २१ | - - २१ | | |
| ४. | | | - - २१ | - - २१ | | |
| ५. | | | - - २१ | - - २१ | | |
| ६. | | | - - २१ | - - २१ | | |

| एकूण सेवाकाल | |
|---|---|

(* सहापेक्षा अधिक शाळांत नोकरी असेल तर स्वतंत्र पानावर माहिती द्यावी)

अ) अर्धवेळ शिक्षक म्हणून प्रवेश अर्ज भरण्यासाठी अंतिम **दिनांक ३० एप्रिल २०२५** हा असेल. निर्दिष्ट केलेल्या सेवेचा तपशील ☐ वर्षे ☐ महिने

| **क्र.** | **विद्यालयाचे नाव** | **शिकविलेले / शिकवीत असलेले वर्ग** | **सेवेचा कालावधी** | | **वर्षे** | **अध्यापनाचे विषय** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **पासून** | **पर्यंत** | | |
| ७. | | | - - १९ | - - १९ | | |
| ८. | | | - - १९ | - - १९ | | |
| ९. | | | - - २० | - - २० | | |
| १०. | | | - - २० | - - २० | | |
| ११. | | | - - २० | - - २० | | |
| १२. | | | - - २० | - - २० | | |

| एकूण सेवाकाल | |
|---|---|

**(* सहापेक्षा अधिक शाळांत नोकरी असेल तर स्वतंत्र पानावर माहिती द्यावी)**

**टीप** -

(१) दिनांकाचा स्पष्ट उल्लेख असावा.

(२) ज्या सेवेचे अनुभव प्रमाणपत्राशिवाय इतर पुरावे (उदा. नियुक्ती आदेश, सेवापुस्तिका, शाळा तपासणी अहवाल, इत्यादी) आपण देऊ शकता ती सेवा नोंदवावी. कारण ते सर्व पुरावे, शाळा मान्यताप्रत शिक्षक पद मान्यता प्रत, कायम सेवेत असल्यास तसे प्रमाणपत्र आपणास मुलाखतीच्या वेळी सादर करावे लागते.)

**प्रतिज्ञापत्र**

सदर आवेदन पत्रात दिलेली सर्व माहिती मी स्वतः भरलेली असून ती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे. ती चुकीची वा खोटी आहे असे आढळल्यास मी प्रवेशास अपात्र होईल किंवा मला प्रवेश मिळाला असल्यास तो रद्द होईल ह्याची मला जाणीव आहे. प्रवेश-अर्जात भरलेली माहिती व संगणकीय प्रपत्रात भरलेली माहिती सारखी आणि एकच असून तफावत आढळल्यास माझ्या विरोधात विद्यापीठाची फसवणूक केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात येईल, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. प्रवेश – अर्जासोबतची माहितीपुस्तिका मी काळजीपूर्वक वाचलेली आहे. त्यातील सर्व अटी व नियम मला मान्य आहेत व त्याबाबत मी कोणतीही तक्रार करणार नाही.

स्थळ : अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

## परिशिष्ट – ०३

## सर्व अर्जदार अध्ययनार्थ्यांनी भरावयाचे हमीपत्र

मी ________________________________________________

(पूर्ण नाव )

१) सेवांतर्गत बी. एड. प्रवेश-अर्ज भरण्यापूर्वी या माहितीपुस्तिकेतील सर्व माहिती मी वाचलेली आहे. प्रवेशासंदर्भात दिलेले सर्व नियम व अटी मला मान्य असून त्याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

२) मी हमी देतो / देते की, प्रस्तुत शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते सराव पाठ व ह्या शिक्षणक्रमाची शाळेशी संबंधित सर्व प्रात्यक्षिके मी विनातक्रार पूर्ण करेन. सदर पाठ व प्रात्यक्षिके सादर केल्याशिवाय मला बी.एड. शिक्षणक्रम पूर्ण करता येणार नाही ह्याची मला जाणीव आहे.

**३) या शिक्षणक्रमासाठी मी माझ्या संस्थाचालक / वरिष्ठ अधिकाऱ्यांची / मुख्याध्यापकांची संमती घेतलेली आहे.**

दिनांक :

अर्जदाराचे नाव व सही

**टीप:** अर्जासोबत कोणत्याही कागदपत्रांची फोटोकॉपी जोडू नये. फक्त प्रवेश-अर्ज सूचनांनुसार अचूक भरून द्यावा.

## परिशिष्ट – ०४

### अत्यंत महत्त्वाचे : केवळ प्रवेशेच्छुक शिक्षकांसाठी शिफारस-प्रमाणपत्र

( इयत्ता १ ली ते ६ वी ला अध्यापन करणारे शिक्षकांसाठी)

बी.एड. प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या प्राथमिक शिक्षक यांनी पुढील शिफारस-प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

---

**★ प्रमाणपत्र ★**

मी ------------------------------------------------------------------------------------------------

(अधिकाऱ्याचे पूर्ण नाव )

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती / प्रशासन अधिकारी, नगरपालिका / शिक्षणाधिकारी , जिल्हा परिषद / आयुक्त, महानगरपालिका /
/ खाजगी शाळेसाठी मुख्याध्यापक वा संस्थाप्रमुख (नको असलेले खोडावे)
——————————असे प्रमाणपत्र देतो की, श्री. / श्रीमती ————————————

शाळेचे नाव ———————————— गावाचे नाव ———————— ता. ——————

जि.————————येथे सहायक शिक्षक पदावर ................. वेतनश्रेणीत कार्यरत असून त्यांची नियुक्ती शासनाने मान्य केलेल्या पदावर दि. / /२० पासून आहे. निर्दिष्ट केलेल्या तारखेप्रमाणे त्यांच्या सेवेचा एकूण कालावधी डी. एड. / डी. टी. एड. झाल्यानंतर ............. वर्षे ........... महिने ........... दिवस इतका असून त्यांच्या सेवेबाबतची पूर्ण कागदपत्रे मी तपासली आहेत. **त्यांनी सदर शिक्षणक्रम पूर्ण करण्याची मान्यता माझ्याकडून घेतलेली आहे**. त्यांच्या सेवेच्या येथे नमूद केलेल्या तपशिलात तफावत व विसंगती राहिल्यास वा सिद्ध झाल्यास मी जबाबदार राहीन.

आयुक्त / गट-शिक्षणाधिकारी – शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, प्रशासन अधिकारी /
/ खाजगी शाळेसाठी मुख्याध्यापक वा संस्थाप्रमुख

स्वाक्षरी व शिक्का

**स्थळ -**

**दिनांक -**